रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३४६
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार ३ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

लोकलमध्ये सहप्रवासी महिलांकडे बाळ देऊन महिला फरार/२
गावठी हातभट्टीवर कारवाई; सात जणांना रंगेहात पकडले/७
किकबॉक्सिंगमध्ये रायगडच्या खेळाडूंची नेत्रदीपक कामगिरी/८

### ‘मकोका’साठी कायद्यात सुधारणा करणार-मुख्यमंत्री



**मुंबई :** ‘एनडीपीएस’म्हणजेच अमलीपदार्थ अंतर्गत अटक झालेल्या आरोपींना जामीन मिळाल्यानंतर त्यांनी पुन्हा गुन्हे केल्याचे सिद्ध झाल्यास आता संघटित गुन्हेगारीअंतर्गत त्यांच्यावर ‘मकोका’ अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा या अधिवेशनातच केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. विधान परिषद सदस्य डॉ.परिणय फुके, एकनाथ खडसे यांनी ड्रग तस्करीसंदर्भात प्रश्न विचारला होता, त्यास मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र एनडीपीएस युनिट स्थापन करण्यात आले असून त्यात अधिकारी व अंमलदारांची नियुक्तीही केली आहे. जिल्हा स्तरावर समन्वय समित्याही स्थापन करण्यात आल्या आहे. यात मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे, असेही ते म्हणाले.

# पनवेल एसटी बस आगाराच्या नूतनीकरणाला तातडीने सुरुवात करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची औचित्याच्या मुद्द्याद्वारे पुन्हा मागणी

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल बस आगाराच्या नुतणीकरणासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी आंदोलन करण्यापासून ते शासन दरबारी सातत्यपूर्ण पाठपुरावा कायम ठेवला आहे, त्यानुसार पुन्हा एकदा त्यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा विधानसभेत मांडत शासनाचे लक्ष वेधून प्रवाशांना न्याय देण्याची मागणी केली. पनवेल बस आगार नूतनीकरणाच्या कामाला तातडीने सुरुवात करा, अशी जोरदार पुनर्मागणी त्यांनी बुधवारी (दि.२) औचित्याच्या मुद्याद्वारे पुन्हा एकदा केली.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना पोटतिडकीने पनवेल बस आगाराच्या कामाचा विषय मांडताना प्रवाशांच्या भावनाही व्यक्त केल्या. (पान २ वर..)

### शासनाकडे मांडल्या प्रवाशांच्या अडचणी

अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या या बस आगारात अनेक प्राथमिक पायाभूत सुविधांअभावी बस चालक, प्रवासी तसेच नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. पनवेल परिसर झपाट्याने विकसित होत असताना नागरीकरणामध्ये मोठी वाढ पाहता पनवेलचे बस स्थानक सर्व सुविधायुक्त असावे, अशी मागणी होती. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी बस आगारात आंदोलनही केले होते. त्यानंतर कायम पाठपुरावा केला. आता पुन्हा एकदा हा प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी ऐरणीवर आणत मार्गी लावण्यासाठी शासनाचे लक्ष केंद्रित केले. आमदार ठाकूर यांनी प्रवाशांना होणाऱ्या अडचणी मांडल्या आणि शासनाचे लक्ष या प्रलंबित प्रकल्पाकडे वेधले. पनवेल परिसर झपाट्याने विकसित होत असून, नागरिक आणि प्रवाशांसाठी सुविधा असलेले आधुनिक बस स्थानक ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळ पावसाळी अधिवेशन २०२५च्या तिसऱ्या दिवशी बुधवारी विधान भवनात राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत प्रवेश करताना पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर व इतर मान्यवर.

## नवी मुंबई विमानतळाला ‘दिबां’चेच नाव देणार -ना. मुरलीधर मोहोळ

**मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दिबा पाटील यांच्या नावाचा ठराव दोन्ही विधिमंडळानी पास करून केंद्राला पाठविला आहे. त्यामुळे नाव तर लोकनेते ‘दिबां’चेच देणार अन्य नावाचा विचारही नाही, असे ठाम आश्वासन केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी बुधवारी (दि.२) येथे दिले.



राजेश गायकर (कामोठे), विनोद म्हात्रे (जासई) किरण पवार (कोल्ही कोपर), शरद ठाकूर (धुतुम) यांनी बुधवारी केंद्रीय उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ यांची विमानतळ नामकरणाबाबत मुंबई येथे भेट घेतली. लोकनेते दिबा पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळात देण्याबाबत राज्य शासनाचा ठराव नागरी विमान उड्डाण मंत्रालयात पाठवण्यात आला, मात्र विमानतळ सुरू होण्यापूर्वी सदर नामकरणाची घोषणा कधी होणार हे जाणून घेण्यासाठी या नामकरण कार्यकर्त्यांनी केंद्रीय मंत्र्यांची नवीन नरिमन पॉईंट येथील भाजप प्रदेश मुख्यालयात आयोजित जनता दरबारात भेट घेतली. (पान २ वर..)

### ...तर काँग्रेस पक्षाला थेट आरोपी बनवता येईल : ईडी

**नवी दिल्ली :** नॅशनल हेराल्डशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टात बुधवारी (दि.२) सुनावणी झाली. या वेळी ईडीने महत्त्वाच्या बाबी मांडल्या. जर आम्हाला पुरावे मिळाले तर आम्ही PMPLAच्या कलम ७० अंतर्गत काँग्रेस पक्षाला या प्रकरणात आरोपी बनवू शकतो. राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांनी तपासात सहकार्य केले नाही आणि मोतीलाल व्होरा यांच्यावर जबाबदारी टाकली आहे. या प्रकरणातील ईडीचे पुढील युक्तिवाद राऊस अव्हेन्यू कोर्ट ३ जुलैला ऐकणार आहे.

## माजी आमदार अपूर्व हिरेंचा भाजपमध्ये प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार व प्रदेश उपाध्यक्ष डॉ.अपूर्व हिरे यांनी बुधवारी (दि.२) भाजपमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची निवड झाल्यानंतर भाजपमध्ये आज पहिलाच हिरे यांनी पक्षप्रवेश केला.

नुकतेच भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी थेट दुरध्वनीकरून डॉ.अपूर्व हिरे यांना पक्षात अधिकृत प्रवेशासाठी आमंत्रित केलेले होते. यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची मुंबई येथे भेट घेऊन चर्चादेखील झाली होती. त्यांनतर



पक्षात अधिकृत प्रवेशाची तारीख निश्चित करण्यात आली होती.

पक्ष प्रवेशावेळी नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातून तसेच नाशिक शहरातून हजारो कार्यकर्ते मुंबई येथे उपस्थित होते.

## निवडक

### कोकणासह मुंबई, ठाण्यात मुसळधार पावसाचा अंदाज

**पुणे :** अनेक ठिकाणी पावसाचा जोर वाढला असून, भारतीय हवामान विभागाने बुधवारी पुणे घाटमाथ्यावर वादळी पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. पुढील ४-५ दिवस कोकणात, मुंबई, ठाणेसह व मध्य महाराष्ट्रातील घाट भागात, भिन्न तीव्रतेसह मुसळधार पावसाची शक्यत असून रायगड जिल्ह्याला गुरुवारी (दि.३) ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे.

### धनुष्यबाण चिन्हावर १४ जुलै रोजी होणार सुनावणी

**नवी दिल्ली :** शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरुद्ध ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली आहे. सर्वोच्च न्यायालय या प्रकरणी पुढील सुनावणी १४ जुलै रोजी घेणार आहे. ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर हा मुद्दा उपस्थित केला.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या १० लाखांच्या देणगीतून इंटरॲक्टिव्ह पॅनलचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील रिटघर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते त्यांनी दिलेल्या १० लाख रुपयांच्या देणगीतून इंटरॲक्टिव्ह पॅनलचे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच त्यांच्या हस्ते ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे यांच्यामार्फत बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचे व मोफत शालेय गणवेश वाटप तसेच रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या सौजन्याने वह्या वाटपाचा कार्यक्रम बुधवारी (दि.२) झाला.

या वेळी विद्यालयातील पाचवीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व वह्या सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ज्युनिअर कॉलेजच्या इंटरॲक्टिव्ह पॅनलसाठी आणखी १० लाख रुपये देणगी जाहीर केली तर राहुल ड्रेसेस पनवेल यांच्याकडून १५ गणवेश मोफत देण्यात आले, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांनी वर्गणी काढून विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला सरपंच सुभाष भोपी, बाळाराम भोपी, बळीराम भोपी, राजेश भोपी, वंदना भोपी, विलास भोपी, उपसरपंच शीतल भोपी, रमेशशेठ पाटील, एम. के.कोंगेरे, व्ही.यू. जगताप, प्रल्हाद भोपी, वासुदेव भोपी, भारत भोपी, गोपीनाथ भोपी, पोलीस पाटील दिपक पाटील, कृष्णा पाटील, विष्णू भगत, प्रल्हाद भोपी, विश्वनाथ भोपी, नवनाथ भोपी, संतोष पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.बी. कारंडे, ए. ए.पाटील आदी उपस्थित होते.



## माणगावच्या चन्नाट धबधब्यात बुडून एकाचा मृत्यू

**माणगाव : बातमीदार**

मुंबई येथील २२ वर्षीय ऋषी वासुदेव पथिपका या युवा पर्यटकाचा माणगाव तालुक्यातील चन्नाट गावच्या धबधब्याखाली नदीत बुडून मृत्यू झाला.

रायगडमधीलल या ठिकाणी एकत्र पर्यटनास आलेल्या तरुणाने आपला मित्र पाण्यात बुडाल्याने हरवला असल्याची फिर्याद माणगांव पोलीस ठाण्यात केली. बुडालेल्या युवकाचा मृतदेह दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी शोधण्यात आला व मृतदेह बाहेर काढण्यासाठी कोलाड व माणगांव येथील बचाव पथकातील सदस्यांना अत्यंत कठीण आणि जिकरीचे धोकादायक डेडबॉडी रिकव्हरी ऑपरेशन पार पाडावे लागले आहे.

निसर्ग पर्यटन हे अतिशय गरजेचे आहे, परंतु निसर्गाचे भान राखून, उपद्रवी पर्यटकांमुळे तसेच सुरक्षिततेच्या आणि हवामानाच्या इशाऱ्यांमुळे शासनाकडून पर्यटन बंदी लावली जाते, पण त्याची पायमल्ली करत हजारो पर्यटक रोज रायगड जिल्ह्यात येत असतात. (पान २ वर..)



**पर्यटकांचे मृतदेह बाहेर काढताना रेस्क्यू टीमच्या सदस्यांना तसेच पोलीस प्रशासन व ग्रामस्थ या सर्वांनाच जीव धोक्यात घालून काम करावे लागते. त्याचा किती त्रास होतो हे शब्दांमधून मांडता येणार नाही. म्हणून आपल्या युवा पिढीने अतिउत्साह, बिनधास्त वागणे व फिरणे शक्यतो सध्याच्या पावसाळी दिवसात टाळणे हेच स्वतःसोबत सर्वांच्याच हिताचे आहे.**
**-सागर दहींबेकर,** रेस्क्यू टीम, कोलाड

## शेलघर गावात रस्ते काँक्रीटीकरणाचा शुभारंभ

### भाजप ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गौण खनिज जिल्हा नियोजन निधीतून गव्हाण ग्रामपंचायतमधील शेलघर गावात अंतर्गत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, महिला मोर्च्याच्या उलवे नोड अध्यक्षा योगिता भगत, भाजप नेते हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, अनंता ठाकूर, रतनशेठ भगत, भाऊशेठ भोईर, अमृत भगत, सुहास भगत, सचिन घरत, रमेश घरत, श्रीधर भगत, अजय भगत, संतोष भगत, सुदर्शन घरत, निलेश भगत, रामदास भगत, महेश भगत, योगेश भगत, राहुल भगत, प्रीतम भगत, मनोहर भगत यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## माऊलींचा दुसरा रिंगण सोहळा

**पुणे : प्रतिनिधी**

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील दुसरे रिंगण बुधवारी खडूस फाटा येथे झाले. मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात माऊलींच्या अश्वांचा दुसरा नेत्रदीपक गोल रिंगण सोहळा माऊलीं माऊलींच्या जयघोषात सकाळी झाला.

माळशिरस येथील मुक्काम आटोपून आज सकाळी माऊलींच्या पालखी सोहळ्याचे वेळापूरच्या दिशेने मार्गक्रमण झाले असताना वाटेत खुडूस फाटा येथे दुसरा गोल रिंगण सोहळा पार पडला. अश्व दौड करतात त्या ठिकाणी रांगोळ्यांची सुंदर पायघडी घालण्यात आली होती. पुष्पांच्या पाकळ्यांनी रिंगण सजवण्यात आले होते.

अश्वांनी फेऱ्या पूर्ण करताच अश्व धावत असलेल्या ठिकाणची धूळ वारकरी भाविकांनी आपल्या मस्तकी लावली. रिंगण सोहळा पार पडताच अवघा आसमंत माऊलींच्या नामघोषाने दुमदुमला.



## पनवेल येथे होणार पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जागतिक युवा कौशल्य दिवसानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग व पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जुलै, २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉ. के.एम. वासुदेवन पिल्लई कॅम्पस, प्लॉट न. १०, सेक्टर १६ न्यू पनवेल इस्ट ता. पनवेल येथे पं.दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना (इंटर्नशिप) उमेदवार निवड मेळाव्याचे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अ.मु.पवार रायगड-अलिबाग यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यातील सर्व खाजगी उद्योजकांनी आपल्या आस्थापनेतील कुशल/अकुशल रिक्तपदे जास्तीत जास्त या कार्यालयास कळविण्यात यावीत. शासनाच्या माध्यमातून खाजगी कंपन्यातील जास्तीत-जास्त रिक्तपदे रोजगार मेळाव्यातून भरती करण्यात येणार आहे. याकरिता या विभागाचे संकेतस्थळावर https://rojgar.mahaswayam.gov.in नोंदणी केलेल्या आस्थापनांनी प्रथम आपल्याकडे हवे असलेले कुशल/अकुशल मनुष्यबळाची माहिती भरावी. (पान २ वर..)

# राज्यातील शाळांमध्ये कमी पटसंख्या असूनही शाळा बंद नाही -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील काही भागांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या घटल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत असून, त्या शिक्षकांचे योग्य समायोजन करण्यात येणार असल्याची व विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे आणि राज्यमंत्री भोयर बोलत होते. यावेळी सदस्य जयंत आसगावकर, ज. मो. अभ्यंकर, अमोल मिटकरी, अभिजित वंजारी, ज्ञानेश्वर म्हात्रे, एकनाथ खडसे, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यात सध्या एकूण १ लाख ८ हजार शाळा आहेत. त्यापैकी सुमारे १८,००० शाळांमध्ये पटसंख्या २० पेक्षा कमी आहे. तरीसुद्धा, त्या शाळा सुरूच राहतील व त्या ठिकाणी शिक्षणात अडथळा येणार नाही, याची संपूर्ण काळजी घेतली जाईल. ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे तिथे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येत आहे. शिक्षकांची कार्यमुक्तता ही समायोजनानंतरच केली जाईल. केंद्र सरकारने सादर केलेल्या अहवालात राज्यातील १,६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा तर ६,५५३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध नाहीत, असे नमूद करण्यात आले आहे. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार, अशा वस्ती किंवा गावांमध्ये



शाळा सुरू करणे ही राज्य शासनाची व स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. आदिवासी भागांत वस्तीगृहांची उभारणी, शिक्षण सुविधांपासून वंचित भागांत प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व धरती आबा ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत ४७ वस्तीगृहे उभारण्यात आली असून सुमारे ४,७०० विद्यार्थ्यांना राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.


राज्यमंत्री भोयर म्हणाले की, 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हा उपक्रम वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवला गेला असून ग्रामीण व आदिवासी भागातील शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सरकारी शाळांमध्येही गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे आणि अनेक खासगी शाळांतील विद्यार्थी आता जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळांमध्ये प्रवेश घेत आहेत. शाळांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध असून, गरज भासल्यास आमदार निधी वापरूनही तत्काळ उपाययोजना करता येतील, असेही राज्यमंत्री श्री. भोयर म्हणाले.

### *संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय*

***विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, २००९ नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. २०१६, २०१८ आणि नंतर २०२३ पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी बैठक घेण्यात आली आणि १४ ऑक्टोबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शाळांना एकाच वेळी संपूर्ण अनुदान देणे शक्य नसले, तरीही टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.***

## छत्र निजामपूर ग्रामपंचायतीचे नाव बदला- गोपीचंद पडळकर

**रायगड : रामप्रहर वृत्त**



स्वराज्याच्या राजधानी असलेल्या किल्ले रायगड परिसरातील छत्र निजामपूर ग्रामपंचायतीच्या नावाचा मुद्दा आता चांगलाच चर्चेत आला आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. निजामाच्या खुणा पवित्र रायगडची ओळख सांगत असतील तर ते आपले दुर्दैव आहे असं ही ते म्हणाले. या नामांतरावरून अनेक मुद्दे उपस्थित केले. किल्ले रायगड ज्या ग्रामपंचायतमध्ये येतो त्या छत्र निजामपूर या ग्रामपंचायतीचे नाव 'रायगड वाडी' करा अशी मागणी पडळकर यांनी केली.

आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले की, रायगड किल्ला हा अखंड हिंदुस्तानातल्या लोकांसाठी ऊर्जास्थान आहे. याच किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक वर्षे वास्तव्य केलं. असं असतानाही हा किल्ला ज्या ग्रामपंचायतीमध्ये येतो त्या ग्रामपंचायतीचं नाव हे छत्र निजामपूर असं आहे. या ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये लहान अशा १२ वाड्या आहेत, असं असतानाही याचं नाव हे निजामपूर कसं? निजामाच्या खुणा या इथं कशा काय आल्या? आदिलशाह, निजामशाह, मुघलाच्या सर्व खुणा या पुसल्या पाहिजेत. रायगड ही ग्रामपंचायत निजामपूर ग्रामपंचायतीच्या अंतर्गत असेल तर आम्हाला मान्य नाही. त्यामुळे या ग्रामपंचायतीचं नाव बदलून रायगडवाडी असं करावं अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार आहे.

स्थानिक गावकऱ्यांनी सुद्धा त्यांच्या भूमिकेची पाठराखण केली. रायगडवाडी हे नाव झालं तर आनंदाची गोष्ट आहे, मात्र हे करत असताना यामध्ये कुठे राजकारण करू नये असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे

## आदिवासी अल्पवयीन मुलीचा विवाह

**म्हसळा :** म्हसळा तालुक्यातील आदिवासी वाडी कोळे येथे अल्पवयीन मुलीचा विवाह झाल्याचे उघडकीस आले आहे .या बाबत तळवडे उपकेंद्राच्या आरोग्य सेविका मनिषा लोंढे यानी दिलेल्या फिर्यादी नुसार म्हसळा पोलीसानी गुन्हा नोंदविला असून २० वर्षाचे नवरदेव आरोपीला पोलीसानी ताब्यात घेतल्याचे समजते. अल्पवयीन मुलगी ही केवळ १४ वर्ष ६ महीन्याची आहे.

आशा सेविकांच्या रुटीन चेक अप मध्ये पिडीत मुलीने तिच्या अडचणीं सांगितल्याने हा प्रकार आरोग्य विभागाच्या लक्षांत आला. संबंधीत मुलांनी सोमवार दि. २ जून रोजी एकमेकांच्या गळ्यांत वर माला आणि मुलाने पिडीत मुलीच्या गळ्यांत मंगळसूत्र घातल्याचे सूत्रांनी सांगितले. आशा सेविकेच्या माध्यमातून सदर पीडीत मुलीची तपासणी केली असता पिडीत मुलगी बाधीत आसल्याची खात्री करण्यांत आली. त्यामुळे आरोग्य सेविका मनिषा लोंढे यानी दिलेल्या फिर्यादी नुसार म्हसळा पोलीसानी गुन्हा नोंदविला असुन तिच्या नवरदेवाला ताब्यात घेण्यात आले आहे.

## आधुनिक ऋषी नवसु वळवी यांचे निधन

**मोखाडा :** मोखाड्यातील आधुनिक ऋषी नवसु वळवी यांचे बुधवारी (दि.२) तोरणशेत येथे निधन झाले. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे



कार्यकर्ते होते व अनेक सामाजिक संस्था मध्ये काम केले होते ते उत्तम आयुर्वेदिक वनस्पतींचे जाणकार होते आणि त्यांना अनेक सामाजिक पुरस्कार मिळाले आहे. डॉ. हेडगेवार पुरस्कार, दधिची पुरस्कार, वनबंधू परिषद पुरस्कार त्यांनी ठाणे जिल्हा आदिवासी वनौषधी पारंपरिक उपचार संघ ही संस्था स्थापन केली. देवबांध मंदिर, अनेक सामाजिक यात्रा सांस्कृतीक इतिहास अभ्यासक होते.

## सफाई कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा; सोन्याची अंगठी केली परत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथील उत्कर्षा रिसॉर्ट मध्ये हरवलेली सोन्याची अंगठी तेथील तरण तलावाच्या पाण्यात सफाई कर्मचाऱ्याला आढळून आली. नवी मुंबई येथील पर्यटकाची हरवलेली पाच ग्रॅम वजनाची अंगठी परत केल्याने त्या कर्मचाऱ्याचे कौतुक होत आहे.



नवी मुंबई येथील ४० पर्यटकांचा गट उत्कर्षा रिसॉर्ट मध्ये पर्यटन आणि वर्षसहली साठी आला होता. सायंकाळी पर्यटक आपल्या घरी परतले. त्यावेळी त्यातील पर्यटक बिपिन गावंड यांच्या हाताच्या बोटात असलेली पाच ग्रॅम वजनाची अंगठी हरवली असल्याचे त्यांच्या लक्षात आले. बिपीन गावंड यांना आपली अंगठी कुठे हरवली आहे किंवा पडली आहे? हे ठामपणे सांगता येत नव्हते. गावंड यांनी ही बाब उत्कर्ष रिसॉर्टचे संचालक उदय पाटील यांच्या कानावर ही बाब घातली.

त्या सोन्याचे अंगठीचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला पण अंगठी काही आढळून आली नाही.दुसऱ्या दिवशी उत्कर्षा रिसॉर्ट मधील कामगार जे स्विमिंग पूल स्वच्छ करायला गेले असता त्यातील सफाई कामगार राजू प्रजापती हा स्वच्छता करीत असताना त्याला फिल्टरच्या जाळी मध्ये अडकून पडलेली सोन्याची अंगठी सापडली.

सदर अंगठी प्रजापती या कामगाराने रिसॉर्ट मालक उदय पाटील यांचेकडे आणून दिली. रिसॉर्टचे संचालक राज पाटील यांनी संपर्क करून अंगठी सापडली असल्याचे कळविले. त्यानंतर बिपीन गावंड यांनी रिसॉर्टवर येउन अंगठी ताब्यात घेतली आणि रिसॉर्ट मालकाचे तसेच कामगाराचे आभार मानले.

## लोकलमध्ये सहप्रवासी महिलांच्या हातात बाळ देऊन महिला फरार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीएसएमटीहून पनवेलकडे जाणाऱ्या लोकलमध्ये एका महिलेने आपल्या अवघ्या१५ दिवसांच्या तान्ह्या बाळाचा परित्याग करून पलायन केल्याची धक्कादायक घटना घडली. ही महिला अंदाजे ३० ते ३५ वषारची असून, तिने मदतीच्या बहाण्याने बाळ दोन तरुणींना सोपवले आणि सीवूड्स स्थानकावर न उतरताच पसार झाली. ३० जून २०२५ रोजी ही घटना घडली.

जुईनगर येथे राहणाऱ्या दिव्यानायडू आणि तिची मैत्रीण भूमिका माने या दोघी चेंबूरहून घरी जात असताना ही महिला त्यांना सानपाडा स्थानकात भेटली. महिलेने त्यांना सांगितले, माझ्याकडे बाळ आणि सामान आहे, मला सीवूड्स स्थानकात उतरायचं आहे, कृपया मदत करा. त्या दोघींनी मदतीला होकार दिला. सीवूड्स स्थानक आल्यावर महिलेने बाळ त्यांच्या हातात दिले, मात्र ती स्वत: लोकलमधून खाली उतरली नाही.

सुरुवातीला दिव्या आणि भूमिका यांना वाटले की, जास्त सामान असल्यामुळे कदाचित तिला उतरता आले नसेल. मात्र, बराच वेळ वाट पाहूनही महिला परतली नाही. त्यामुळे त्यांनी बाळासह घरी जाऊन त्याची काळजी घेतली आणि त्यानंतर वाशी रेल्वे पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

याबाबत रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे यांनी माहिती दिली की, सदर महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळ सध्या रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात असून, त्याची प्रकृती स्थिर आहे. पोलिसांनी चार शोधपथके तयार केली असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे महिलेचा शोध सुरू आहे. प्राथमिक तपासात संबंधित महिला खान्देश भागातील असल्याची शक्यता आहे. मात्र, स्थानकांवरील अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने तपासात अडथळा येत असल्याचे पोलिसांनी सांगितले. बाळाच्या आईविषयी माहिती असल्यास पोलिसांशी संपर्क साधावा,

## शेतकऱ्यांशी जवळीक हे विविध योजनांच्या लाभासाठी प्रेरणादायी-दिप्ती गाट

### कोतवाल खुर्द येथे कृषी दिनाचे यशस्वी आयोजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि शेतकऱ्यांसोबत जवळीक साधण्यासाठी कृषीदिनाचे आयोजन पंचायत समिती आणि तालुका कृषी कार्यालयामार्फत विविध गावांमध्ये केले जात असून हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गवासी माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या जन्मदिवस म्हणून कृषी दिन साजरा केला जातो. शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी हे दरवर्षीचे आयोजन उपयुक्त ठरणार आहे, असा विश्वास पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी व्यक्त केला. यावेळी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे व अन्नप्रक्रिया उद्योग उभारावेत असे आवाहनही केले.

पोलादपूर तालुक्यातील कोतवाल खुर्द या गावी १ जुलै कृषी दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी प्रास्ताविकामध्ये उपकृषी अधिकारी सतीश देशमुख यांनी स्व. वसंतराव नाईक यांचे यांनी केलेल्या कार्याबद्दल माहिती दिली. हरितक्रांती, श्वेतक्रांती, रोजगार हमी योजना तसेच कृषी विद्यापीठांची स्थापना अशी अनेक महत्त्वाची कार्य त्यांच्या कार्यकाळात झाली असल्याचे यावेळी सांगितले.

सदर कार्यक्रमांमध्ये माजी जिल्हा परिषद कृषीसभापती उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी फलोत्पादन व रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले असल्याने शेतकऱ्यांनी फळबाग लागवड तसेच बांबू लागवड करावी, असे आवाहन केले. तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी कृषी यांत्रिकीकरण व त्यातील अनुदान बाबत माहिती दिली. सहाय्यक गटविकास अधिकारी हंबीर यांनी कृषी विषयक पंचायत समिती मार्फत योजना बाबत माहिती दिली त्याप्रमाणे उपकृषी अधिकारी रवींद्र गुंड यांनी रोजगार हमी योजना फळबाग लागवड, बांबू लागवड बाबत माहिती दिली. आत्मा योजनेचे कपिल पाटील यांनी, सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेबद्दल माहिती दिली.

याप्रसंगी कोतवाल पंचक्रोशीतील व तालुक्यातील बहुसंख्येने शेतकरी उपस्थित होते. कृषीदिनाच्या कार्यक्रमाला कोतवाल बुद्रुक सरपंच रेखा दळवी, पैठण सरपंच तसेच कोतवाल सरपंच अविनाश शिंदे उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नामदेव शिंदे, आदिनाथ सकपाळ, माजी सरपंच नामदेव शिंदे, अविनाश शिंदे, श्रीराम मोरे, साईराम शिंदे, सतीश शिंदे, उत्तम शिंदे, कृषी अधिकारी मंगेश साळी, विस्तार अधिकारी अरुण धिवरे, ठाकूर,कृषी विभागातील सर्व अधिकारी, तसेच सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी कृषी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अखेरिस कोतवाल खुर्द ग्रामस्थांनी कृषी दिंडी काढण्यात आली तसेच वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला.



पान १ वरून

## पनवेल एसटी बस आगाराच्या नूतनीकरणाला तातडीने सुरुवात करा

राज्य परिवहन महामंडळाच्या पनवेल आगाराच्या नूतनीकरण अर्थात बसपोर्ट कामाला सन २०१८ साली शुभारंभ करण्यात आला. बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर असलेले या बसपोर्टच्या कामाला बराच कालावधी होऊनसुद्धा सुरुवात झाली नाही. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची विघ्न सातत्याने या कामामध्ये येत आहेत. कंत्राटदाराने अजूनही या कामाला सुरुवात केली नाही आणि त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. प्रवाशांना सुविधांच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. आणि वर्षानुवर्षे याचा पाठपुरावा करून देखील यात फरक पडत नाही. या संदर्भात राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या पनवेल बस आगाराला भेट दिली होती, या वेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशही दिले होते मात्र अजूनही या कामाला सुरुवात झाली नाही, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात नमूद केले. प्रवाशांच्या दृष्टिकोनातून या पनवेल बस आगाराच्या नूतनीकरण कामाला तातडीने सुरुवात करण्याची गरज असल्याचे अधोरेखित करत तशी कार्यवाही तात्काळ व्हावी, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाकडे औचित्याच्या मुद्यातून केली.

पनवेल येथील अतिशय महत्त्वाचे मानले जाणारे राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाला मंजूरी मिळून बराच कालावधी होऊनसुद्धा कामाला सुरूवात झाली नाही. पनवेल बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाबाबत वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करूनसुद्धा संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाला विलंब झाला. त्यामुळे बस आगारातील अनेक गैरसोयींमुळे नागरिक व प्रवाशांमध्ये पसरलेल्या चिडीच्या व असंतोषाच्या भावना शासन दरबारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मागणी आणि लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून यापूर्वीही मांडली होती.

पनवेल बस आगाराचे काम लवकरात लवकर पूर्ण झाले पाहिजे ही आमदार प्रशांत ठाकूर व प्रवाशांची अपेक्षा आहे, आणि त्या दृष्टीकोनातून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन तत्कालीन मंत्री दादाजी भुसे यांनी २०२३च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले होते. तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊनही या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांचा पाठपुरावा कायम राहिला आहे.

## नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव देणार –ना. मुरलीधर मोहोळ

विनोद म्हात्रे यांनी याबाबतचे एक निवेदन केंद्रीय मंत्र्यांना दिले. त्यावर राजेश गायकर यांनी नामकरण कधी घोषित होईल याबाबत केंद्रीय मंत्र्यांना विचारणा केली. यावर मंत्री महोदयांनी प्रधानमंत्री कार्यालयाकडून केंद्रीय कॅबिनेटकडे हा प्रस्ताव पाठविला असून केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी मिळताच तो आमच्या मंत्रालयाकडे परत येईल तशी त्याची घोषणा होईल, असे सांगितले.

विनोद म्हात्रे यांनी यावर विमानतळास अन्य नावाचा विचार होतोय का? अशी चर्चा काही लोक करीत असल्याचे सांगितले यावर केंद्रीयमंत्र्यांनी दि.बा. पाटील नावा व्यतिरिक्त अन्य कुठल्याही नावाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडून आलेला नाही आणि केंद्राचाही अन्य कुठल्याही नावाचा विचारही नसल्याचे त्यांनी या वेळी उपस्थितांना ठामपणे सांगितले.

## माणगावच्या चन्नाट धबधब्यात बुडून एकाचा मृत्यू

सध्याच्या दिवसांमध्ये धबधब्यांमध्ये, कुठल्याही कुंडामध्ये, नदीमध्ये धोकादायक परिस्थितीती, फक्त समाजमाध्यमांच्या रीलच्या नादात पोहण्यासाठी किंवा उड्या मारण्यासाठी जाऊ नका. कृपया घडणाऱ्या या दुर्दैवी घटनांमधून आता तरी बोध घेऊन, जबाबदारीने पर्यटन करा, असे माणगाव येथील वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी सांगितले.

एस.व्ही.आर.एस.एस. कोलाड रेस्क्यू टीमचे सागर दहींबेकर, प्रयाग बामुगडे, निलेश लोखंडे, श्वेता विश्वकर्मा, शुभम सणस, सुनील सावंत, अनुप देशमुख, देवेन रटाटे, सिद्धार्थ पवार, अविनाश वाघे, मनोज थिटे, दमेश तांबट, आदेश पाटेकर, शशांक दोडामानी आणि भरत मालुसरे तर शेलार मामा रेस्क्यू टीम भिरा पाटणूसचे प्रशांत शेलार, शेलार मामा, रुपेश शेलार, संतोष बांदल, मजीत कागदी व माणगावमधून वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर, सागर पाटील, प्रतीक मोरे, शुभांकर वनारसे व चन्नाट गावचे ग्रामस्थ अनिल कुले, नमन मांडवकर, बाबू मांडवकर, श्रीराम थोरे, मनोहर धाडवे, सहदेव सुतार, मधुकर दिवेकर, काशिनाथ तांदळेकर, गौतम घाग, विपुल भोसले, किरण दिवाले, संदीप दिवेकर, विक्रम तांदळेकर, शंकर पवार व माणगांव पोलीस शिपाई दत्ता पवार आणि काळे या सर्वांनी टीमवर्कने अतिशय जोखमीचे रिकव्हरी ऑपरेशन पार पाडले.

## पनवेल येथे होणार पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

ही माहिती भरताना प्रथम उपरोक्त संकेतस्थळावर Employment - Employer (List a Job)- Employer Login या क्रमाने जाऊन आपल्या आस्थापनेचा युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपल्या आस्थापनेची माहिती पहावी. त्यातील PanditDindayalUpadhyay Job Fair या ऑप्शनमधून दिसणाऱ्या रोजगार मेळाव्यांच्या यादीतील आपल्या जिल्ह्याच्या नावावरील View Details - Job Details - Agreeand Post Vacancy--dd New Vacancy ऑप्शनवर क्लीक केल्यानंतर रिक्तपदांची माहिती भरून शेवटच्या पानावरील Save Vacancy वर क्लीक करावे. त्याचप्रमाणे ज्या आस्थापनांची यापूर्वी उपरोक्त संकेतस्थळावर नोंदणी करण्यात आलेली नाही त्यांनी https://rojgar.mahaswayam.gov.inया संकेतस्थळावर Employment-Employer (List a Job)-Register या क्रमाने जाऊन नवीन नोंदणी करावी व आपल्या आस्थापनेची नवीन नोंदणी केल्यानंतर आपल्याकडील रिक्तपदे अधिसूचित करून संकेतस्थळावर १० जुलै २०२५पर्यंत अधिसूचित करावीत.

संकेतस्थळावर नवीन नोंदणी करणे व रिक्तपदे अधिसूचित करणे या संदर्भात आपणास काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२०२९ किंवा महेश भा.वखरे, लिपिक–टंकलेखक यांचे ९४२१६१३७५७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर वर संपर्क साधावा.

## संपादकीय


# दमदार डिजिटल वाटचाल

‘डिजिटल इंडिया’च्या दशकपूर्तीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच या मोहिमेच्या गेल्या दहा वर्षांतील वाटचालीचा आढावा घेतला. सर्वांसाठी सोप्या आणि सर्वसमावेशक डिजिटल तंत्रज्ञान सुविधा निर्माण करण्याच्या हेतूने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाने संधींचे लोकशाहीकरण करत गरीब-श्रीमंतांमधील दरी कमी केली आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कार्यकाळ सुरू झाला तेव्हा म्हणजे २०१४ साली देशात डिजिटल साक्षरता कमी होती आणि इंटरनेटचा वापरही मर्यादित होता. २०१४ साली देशात सुमारे २५ कोटी इतकीच इंटरनेट कनेक्शन्स होती. आज ही संख्या वाढून ९७ कोटींपेक्षा जास्त झाली आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात, अगदी दुर्गम गावांपर्यंतही ४२ लाख किमीपेक्षा जास्त लांब ऑप्टिकल फायबर केबलचे जाळे पसरले आहे. दहा वर्षांच्या काळात बदललेल्या या चित्राकडे लक्ष वेधत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘डिजिटल इंडिया’ हा आता केवळ एक सरकारी कार्यक्रम राहिलेला नाही तर ती एक लोकचळवळ बनली आहे असे म्हटले आहे. विसाव्या शतकात अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा मानल्या जायच्या. आता एकविसाव्या शतकात त्यात वीज, इंटरनेट व मोबाइल यांचाही समावेश करावा लागेल. दहा वर्षांपूर्वी देश डिजिटल साक्षर बनेल का नाही याविषयी अनेकांना शंका होती. आज मात्र १४० कोटी भारतीयांनी डिजिटल साक्षरतेला स्वीकारलेले दिसते. जगभरात आज जितके डिजिटल आर्थिक व्यवहार होतात, त्यातले निम्मे व्यवहार भारतात होतात. ही क्रांती तर आपल्याला अवतीभवतीही सहज दिसते. अर्थात देशातील विरोधी पक्षांना मात्र डिजिटल व्यवहारांत भारताने गेल्या काही काळात घेतलेली ही मोठी झेप दिसत नाही. ते याबद्दलही अनेक प्रश्न उपस्थित करतात. विरोधासाठी विरोध ही त्यांची प्रवृत्ती होऊन बसली आहे, परंतु भारत आज एक अत्यंत गतिमान अर्थव्यवस्था म्हणून जगभरात ओळखला जातो हे त्यांनाही नाकारता येणार नाही. आणि या वाटचालीत ‘डिजिटल इंडिया’चेही योगदान आहेच. युपीआयद्वारे वर्षाला १०० अब्जांपेक्षा जास्त आर्थिक व्यवहार होतात. आज विशेषत: शहरी भागात तरी नागरिकांना मोबाईल फोनशिवाय दैनंदिन जीवन अडचणीचेच वाटू शकेल. जगण्याशी संबंधित सर्वच बाबींना डिजिटल क्रांतीचा स्पर्श झाला आहे. शिक्षण, आरोग्य क्षेत्र यात हा बदल ठळकपणे जाणवतो तसेच सरकारी व प्रशासकीय पातळीवरही यामुळे मोठे बदल घडून आले आहेत. थेट लाभ हस्तांतरणाद्वारे ४४ लाख कोटी रूपयांहून अधिक रक्कम नागरिकांकडे थेट हस्तांतरित करण्यात आली आहे. आपल्या अवतीभवती डिजिटल क्रांतीतून सतत नवनवीन गोष्टींची भर पडताना दिसते आहे. आपल्या मोटारींचे स्वरूप बदलत चालले आहे. ड्रोन कॅमेरे आपल्या सभासोहळ्यांचा अविभाज्य भाग बनले आहेत. गतिमान इंटरनेट सेवा आता देशातील शहरांपासून गलवान, सियाचीन व लडाखसारख्या सीमेवरच्या सैन्य चौक्यांपर्यंत पोहचली आहे हेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी नमूद केले आहे. या डिजिटल क्रांतीने लघुउद्योजकांना बळ दिले आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील कारागीर व उत्पादक आज मध्यस्थांशिवाय देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. जगभरात आता भारताची ओळख ‘आयटी हब’ म्हणून आहे. भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेअंतर्गत १.८ लाखांपेक्षा जास्त स्टार्टअप अस्तित्वात आहेत. येत्या काळात आपली ही ताकद वाढतच जाणार आहे. डिजिटल क्षेत्रात ‘इंडिया फर्स्ट’ने सुरुवात करून आता आपण ‘इंडिया फॉर वर्ल्ड’पर्यंत पोहचलो आहोत.**

# आपत्तीनिवारण आणि रेस्क्यू टिम कार्यरत

नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन आणि निवारणासंदर्भात कोणताही कायदा येण्यापूर्वी आपत्तीवेळी एनडीआरएफ टीमऐवजी मिलीटरीला पाचारण करून बचावकार्य करण्याची प्रथा अस्तित्वात होती. केंद्रीय कृषीमंत्री पदावर असलेल्या ना.शरदश्चंद्र पवार यांनी महाड व पोलादपूर तालुक्यातील २५ व २६ जुलै २००५च्या महापुर, भूस्खलन आणि अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन आमदार स्व.माणिकराव जगताप यांच्यासमवेत जुई, कोंडिवते, रोहन, दासगांव भागाचा दौरा केला. त्यावेळी जनतेने ’लोकं बुडत होती; तेव्हा तुम्ही मिलीटरी का पाठवली नाही?’ असा सवाल तत्कालिन ना.शरदश्चंद्र पवार यांना केला असता त्यांनी खराब हवामानामध्ये हेलिकॉप्टर कुठे थांबवायचं? हवेत किती काळ हेलिकॉप्टर ठेऊन महापुरामध्ये बुडणाऱ्यांना वाचवायचं? मिलीटरी येईपर्यंत प्रत्येक शेजाऱ्याने शेजाऱ्याला वाचवायचं आणि माणसानेच माणसाला तारायचं!!! असे महत्वपूर्ण उदगार काढले. यानंतर २००७ मध्ये नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायदा तयार झाला. आपत्ती व्यवस्थापनामध्ये एनडीआरएफ सारख्या यंत्रणा सक्षमपणे तैनात होऊ लागल्या. बचाव कार्याप्रमाणे बचाव करीत स्वत:ला कसे वाचवायचे याचेही गावोगावी प्रशिक्षण देण्याची गरज असताना केवळ शासकीय स्तरावर या प्रशिक्षणाला सुरू झाली आहे. महाड आणि पोलादपूर तालुक्यांमध्ये खासगीस्तरावर सेवाभावी रेस्क्यू टिम कार्यरत असून पोलादपूर तालुक्यातील लोहारे ते तुर्भे पुलालगतच्या कोल्हापूरी तंत्राच्या बंधाऱ्यालगत एक तरूण आंघोळ करताना वाहून गेल्यानंतर स्थानिकांच्या बचावकार्यादरम्यान आपत्ती ओढावल्यास सरकारी मदतीची तरतूद करण्याचा विचार पुढे आला असता एनडीआरएफ आणि स्थानिकांच्या बचावकार्यामध्ये खोडा





घालण्याच्या हेतूने एनडीआरएफ प्रशिक्षणात व्यग्र तर अप्रशिक्षित स्थानिकांची नौका बचावकार्यादरम्यान हिंदकळल्यामुळे तिघांच्या जीवावर बेतल्याने स्थानिकांना बचावकार्यास मज्जाव करण्याबाबतचा विचार पुढे आला.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील लोहारे तुर्भे पुलाच्या कोल्हापूर तंत्राच्या बंधार्याजवळ सोमवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पोहणाऱ्या तीन तरुणांपैकी एक तरुण अचानक पाण्याच्या प्रवाहात ओढला गेला आणि तो बेपत्ता झाला. या घटनेनंतर सोमवारी दिवसभर नरवीर, काळभैरवनाथ व साळुंखे रेस्क्यू टीम यांच्यासह आपदा मित्र यांनी बेपत्ता तरुणाचा शोध घेण्याचा दिवसभर केलेला प्रयत्न सायंकाळपर्यंत असफल ठरुन शोधकार्य अर्ध्यावर सोडण्यात आले. दिवसभर या घटनेची चर्चा संपूर्ण तालुक्यात होत असताना कोल्हापुरी तंत्राच्या बंधाऱ्याजवळ पाण्याच्या प्रचंड प्रवाहासमोर रेस्क्यू टीमची नौका पलटल्याने उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकला यामुळे देखील संपूर्ण तालुक्यात हा चिंतेचा विषय ठरला. पोलादपूर तालुक्यातील लोहारे ते तुर्भे प्रवासासाठी उत्तर वाहिनी सावित्री नदीच्या पात्रावर बांधण्यात आलेल्या पुलालगतच्या केटी बंधाऱ्याच्या जवळील कातळाजवळ लार्सन एँड टूब्रो कंपनीचे तिघे कंत्राटी कामगार आंघोळ करण्यानिमित्त पोहण्यासाठी उतरले. यावेळी केटी बंधाऱ्यातून वाहणाऱ्या सावित्री नदीच्या पाण्याचा प्रवाह अतिशय वेगवान असल्याने त्यांच्यापैकी एक तरुण पाण्यात ओढला गेला आणि तो गटांगळ्या खात काही अंतरापर्यंत जात असताना बेपत्ता झाला. या घटनेनंतर आपदा मित्र किरण पार्टे व संतोष मोरे आणि काळभैरवनाथ रेस्क्यू टीमचे दीपक उतेकर, दिनेश दरेकर, लक्ष्मण कळंबे, उमेश पालकर, दीपक उतेकर, अरुण मोहिते, नरवीर रेस्क्यू टीमचे रामदास कळंबे, साळुंखे रेस्क्यू प्रशांत साळूंके, नयन ठाकूर, धैर्यशील भोसले, पार्थ बुटाला तसेच सीस्केप महाडचे प्रेमसागर मेस्त्री आदींनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे पीएसआय पवार आणि पोलीस कर्मचारी तसेच तहसील कार्यालय तहसील कार्यालय पोलादपूरचे कर्मचारी यांनी उपस्थित राहून शोधकार्यामध्य सहभाग घेतला. यावेळी कोल्हापुरी तंत्राच्या बंधाऱ्याजवळील पाण्याच्या वेगवान प्रवाहामध्ये रिव्हर राफ्टिंगसाठी टाकण्यात येणारी नौका गेली असता ते अचानक कलंडली आणि रेस्क्यू टीम मधील सदस्य पाण्याच्या प्रवाहात कोसळले. सर्व रेस्क्यू टीम सदस्य शिताफीने प्रवाहापासून दूर झाले. त्यामुळे सर्वच जण नदीच्या किनाऱ्यापर्यंत पोहोचू शकले. मात्र या दरम्यान लोहारे ते तुर्भे पुलावरून आणि केटी बंर्धायावरून बचाव कार्य पाहणाऱ्या सर्वच ग्रामस्थांच्या कायद्याचा ठोका चुकला. या बचाव कार्यादरम्यान वाहून गेलेल्या तरुणाचा दिवसभरात तपास लागू शकला नाही त्यामुळे सायंकाळी उशिरा शोधकार्य थांबविण्यात आले. यावेळी जोगेन सुरन ओरण हा २१ वर्षीय तरूण लार्सन ऍण्ड टूब्रो कंपनीमध्ये कंत्राटी तत्वावर कामाला असून तो दोन सहकाऱ्यांसमवेत साडेअकरा वाजण्याच्या सुमारास आंघोळी साठी सावित्री नदीपात्रात उतरला असता प्रवाहाचा वेग तीव्र असल्याने वाहून गेला, असे पोलादपूर पोलीस आणि महसूल विभागातर्फे सांगण्यात आले. यानंतर बचावकार्य थांबविण्यात येणार असताना तेथे एनडीआरएफची टीम घटनास्थळी हजर झाली. यापुढेही तीन दिवस म्हणजे एकूण चार दिवस रेस्क्यूचे प्रयत्न सुरू राहिले. मृतदेह मिळाला नाही. मात्र, यानिमित्ताने स्थानिकांचे बचावकार्य आणि एनडीआरएफ प्रशिक्षणात व्यग्र अशा चर्चे चे पेव फुटले. वास्तविक पाहता स्थानिकांच्या सहभागाशिवाय एनडीआरएफ पथकाला बचाव कार्य शक्य नसल्याचे स्पष्ट असताना तसेच एनडीआरएफ प्रशिक्षणात व्यग्र असल्याची चर्चा ही जर उपहासात्मक मानली तर प्रशिक्षण स्थानिकांनाच दिले जात होते. या वादादरम्यान, महाड येथे होऊ घातलेल्या एनडीआरएफ बेस कॅम्पला विरोध होता काय? असा सवाल उपस्थित होत असून तसे नसल्यास स्थानिकांना प्रशिक्षणाविना बचावकार्यात सहभागी होण्याची संधी नाकरण्याचा प्रयत्न म्हणजे एनडीआरएफला असहकार करण्याचा प्रकार असू शकतो. अशा चर्चांना आपत्ती निवारण कार्यात बाधा आणण्याचा प्रयत्न म्हणून गांभिर्याने प्रशासनाने पाहण्याची गरज आहे.





## बदलते तंत्रज्ञान

### वनप्लस पुन्हा एकदा करणार डबल धमाका

प्रिमिअम स्मार्टफोन कंपनी वनप्लस भारतीय स्मार्टफोन बाजारात पुन्हा एकदा डबल धमाका करण्याची तयारी करत आहे. येत्या ८ जुलैला वनप्लस दोन फोन लॉंच करणार आहे. काही महिन्यांपूर्वीच वनप्लसने १३ सिरीज लॉंच केली होती. यानंतर आता काहीशी स्वस्तातील सिरीज लॉंच करणार आहे.




कंपनीने सोशल मीडियावर याची माहिती दिली आहे. यामध्ये वनप्लस नॉर्ड सिरीज लॉंच होणार असल्याचे दाखविण्यात आले आहे. यानुसार वनप्लस नॉर्ड ५ आणि वनप्लस नॉर्ड सीई ५ हे फोन असणार आहेत. रिपोर्टनुसार या फोनमध्ये वनप्लस १३ सिरीजमध्ये वापरलेला कॅमेरा देण्यात येणार आहे. यामुळे चांगल्या कॅमेरावाला फोन ज्यांना बजेटमध्ये हवा आहे, त्यांच्यासाठी ही मोठी संधी आहे.

वनप्लसच्या नॉर्ड ५ मध्ये ५० मेगापिक्सलचा कॅमेरा देण्यात येणार आहे. १३ सिरीजमध्ये सोनीचा एलवायटी ७०० हा कॅमेरा वापरण्यात आला होता. तोच यामध्ये देण्यात आला आहे. याचबरोबर लेटेस्ट प्रोसेसरही या फोनमध्ये मिळणार आहे. याचबरोबर ५० मेगापिक्सलचा सेल्फी कॅमेरा देखील दिला जाणार आहे. याचबरोबर फास्ट चार्जिंगसाठी ८० किंवा १०० वॉटचा चार्जर सपोर्ट देखील मिळण्याची शक्यता आहे. तसेच आतापर्यंतच्या वनप्लसच्या मोबाईलपेक्षा जास्त मोठी बॅटरी देखील दिली जाण्याची शक्यता आहे.

याचबरोबर १४४Hz रिफ्रेश रेटचा सहा इंचापेक्षा मोठा डिस्प्ले जो AMOLED असू शकतो, दिला जाण्याची शक्यता आहे. परफॉर्मन्ससाठी स्नॅपड्रॅगन ८s Gen-चा प्रोसेसर दिला जाऊ शकतो. तसेच ८-१२ जीबी रॅम आणि ५१२ जीबीपर्यंतची स्टोरेज स्पेस दिली जाऊ शकते. किंमतीबाबत अंदाज लावायचा झाल्यास नॉर्ड ५ ३०-३५ हजाराच्या आत तसेच नॉर्ड सीई ५ हा २०-२५ हजारांच्या आत उपलब्ध केला जाण्याची शक्यता आहे.


मोबाईलची जबरदस्त क्रेझ आबालवृद्धांमध्ये आहे. याचाच विचार करून मोबाईल कंपन्या विविध प्रकारचे हॅण्डसेट बाजारात आणत असते, ज्यामध्ये निरनिराळी फिचर्स उपलब्ध असतात.

# इतिहासकार, नाटककार दत्तात्रय गोडसे

दत्तात्रय गणेश गोडसे हे इतिहासकार, नाटककार, चित्रकार, नेपथ्यकार, लेखक, कला समीक्षक व १९८८चे संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेते होते. त्यांनी वि.का. राजवाडे, म.वि धोंड यांना अनुसरून फक्त मराठी भाषेत लेखन केले.

द.ग. गोडसे यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील वाघोडे येथे ३ जुलै इ.स. १९१४ रोजी झाला. त्यांनी शालेय शिक्षण सावनेरला, आणि कॉलेज शिक्षण नागपूरच्या मॉरिस आणि नंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजातून घेतले. त्यांनी लंडन विद्यापीठाच्या ’स्लेड स्कूल ऑफ फाइन आर्ट’मधून ललितकलेचे प्रशिक्षणही घेतले.

गोडसे यांनी मराठीत अनेक विषयांवर लिखाण केले. शिवाजी-मस्तानी-रामदास या ऐतिहासिक व्यक्तींवर, मराठी वाङ्मय-नाटकांवर, चित्रकला-शिल्पकला-वास्तुकलांवर आणि अगदी बुद्धकालीन स्थापत्यावर गोडसे लिहीत असत. थॉमस डॅनियल ने इ.स. १७९० साली पेशव्यांच्या दरबाराचे एक रंगचित्र काढले होते. त्यावरही गोडसेंनी एक लेख लिहिला होता. त्यांचा मराठी चित्रकार दीनानाथ दलाल यांच्यावर लिहिलेला भारलेल्या जगातून आलेला अलौकिक माणूस हा लेख अतिशय गाजला होता. ना.सं. इनामदार यांनी ’राऊ’ ही कादंबरी लिहिताना द.ग.



**निमित्त**

गोडसे यांची खूप मदत झाली, असे त्या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. द.ग. गोडसे यांनी आपल्या चित्रांनी अनेक मासिके आणि पुस्तके सजवली. १०७हून अधिक नाटकांचे ते नेपथकार होते. तीन मराठी आणि दोन हिंदी चित्रपटांचे ते कलादिग्दर्शकही होते.

साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील घटना, ढोंगबाजी, गटबाजी, मक्तेदारी, भाषेचा-आशयाचा बोजडपणा, नावीन्याच्या आणि प्रयोगशीलतेच्या नावाखाली चाललेला भोंगळपणा हे वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या या ’वाद-संवादा’चे विषय असत. वृत्ती-प्रवृत्तींवर टीका केली जाई आणि ती व्यक्तिगत पातळीवर घसरणार नाही, याची काळजीही घेतली जाई. शमा आणि निषाद म्हणजे अनुक्रमे द.ग.गोडसे आणि मं.वि. राजाध्यक्ष यांनी हे चुरचुरीत आणि पौष्टिक सदर जवळजवळ नऊ वर्षे चालवले. त्या काळात या सदरावर अनेकांचा रोषही ओढवला, पण अशी वृत्तिलक्ष्यी टीका वाचण्याची सवय वाचकांना लागली. ’टवाळा आवडे विनोद’ या वचनाला छेद देणारे लेखन द.ग. गोडसे यांनी या सदरात सातत्याने केले.

१९४३ ते ५३ या वर्षांतील या सदरांचे निवडक संकलन वाद-संवाद (निषाद आणि शमा) याच नावाने प्रसिद्ध झाले आहे. तात्कालिक लेखन वगळून आजही प्रस्तुत वाटेल, असे लेख यात घेतल्याचे संपादकांनी म्हटले आहे. ’मुद्रणसाक्षेप’ किंवा ’पदवी आणि प्रबंध’ असे लेख याची उत्तम उदाहरणे आहेत.

द.ग. गोडसे यांच्याविषयी वाङ्मयशास्त्रविद्, भाषाशास्त्री आणि चिन्हाभ्यासशास्त्रतज्ज्ञ अशोक रामचंद्र केळकर यांनी लिहिले आहे, ’गोडसे यांचे कलेच्या इतिहासासंबंधीचे लिखाण क्वचित विवाद्य असले तरी जीववादाच्या दृष्टिकोनातून अतिशय मोलाचे आहे. गोडसे यांनी केवळ मराठीतच लिहिण्याचे जे ठरविले, त्यामुळे मराठी वाचकांना अपरिमित लाभ झाला आहे. ५ जानेवारी इ.स. १९९२ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### स्माईल डिप्रेशन : चेहऱ्यावर हासू अन् हृदयात आसू!

चेहऱ्यावर सतत हास्य, बोलण्यात उत्साह, सामाजिकदृष्ट्या सक्रिय आणि मनमिळावू स्वभाव, पण याच व्यक्तीच्या हृदयात वेदनेची खोल नदी वाहत असते. ही अवस्था म्हणजेच स्माइल डिप्रेशन होय. समोरून पाहणाऱ्याला ती व्यक्ती आनंदी वाटते, पण आतून ती मानसिक संघर्ष, निराशा, एकटेपणा आणि थकलेली असल्याचे दिसते. या मानसिक आजाराची भीती एवढी आहे की, तो लपून राहतो आणि म्हणूनच अधिक घातक ठरतो.



‘स्माइल डिप्रेशन’ म्हणजे नेमके आहे तरी काय?

स्माइल डिप्रेशन म्हणजे डिप्रेशनची ती अवस्था जिथे व्यक्ती चेहऱ्यावर आनंद दाखवते, पण आतून खचलेली असते. ती सामाजिकदृष्ट्या कार्यरत असते, नोकरी, दैनंदिन कामे, जबाबदाऱ्या सांभाळत असते, पण एकांतात गेल्यावर तिला खिन्नता, शून्यता, आत्मगंड, दु:ख यांचा सामना करावा लागतो. हे दुखणं दिसणारे नसल्यामुळे अवस्थेतील व्यक्तींकडे अनेकदा दुर्लक्ष होते. अशावेळी कुटुंबियातील सदस्यांनी संबंधित रुग्णाशी चांगला संवाद साधावा.

कशी मात कराल?

स्वत:शी प्रामाणिक राहावे. डोळस संवाद साधावा, विश्वासार्ह मित्र, कुटुंबीय वा समुपदेशक यांच्याशी बोलावे. नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे.

मेंदूतील आनंददायक रसायने वाढतात, योग व ध्यानमुळे मन स्थिर राहते, डायरी लिहावी. भावना शब्दांत उतरवणे ही पहिली पायरी. मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशकाच्या सल्ल्याने औषधोपचार घेणे गरजचे असते.

चेहऱ्यावर हास्य पण डोळ्यांत रिकामेपणा, एकांतात रडू येणे किंवा भावनांचा उद्रेक, झोप न लागणे, जास्त झोप येणे, भूक कमी होणे किंवा अनियमित होणे, सतत थकवा जाणवणे, स्वत:बद्दल नकारात्मक विचार, घबराट, उत्साही वाटत असूनही आतून काहीही वाटत नसणे आदी लक्षणे आहेत. ही लक्षणे आढळताच संबंधित रुग्णांनी मानसिक रोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

स्माइल डिप्रेशन ही एक अदृश्य मानसिक समस्या आहे. समाजाने हसत खेळणाऱ्या चेहऱ्यांपलीकडे पाहायला शिकले पाहिजे, कारण अनेकदा सर्वात मोठे दु:ख मूक, हसते आणि एकटे असते. त्यामुळे आपण सर्वांनी एकमेकांच्या भावनिक आरोग्याकडे जागरूकपणे पहायला हवे, असे मानसिक रोग तज्ज्ञ डॉ. सचिन हेमके यांनी म्हटले आहे.

# भाजप प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाणांच्या नियुक्तीने खोपोली शहरात जल्लोष



**खोपोली;** भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची मुंबई येथे नियुक्तीची घोषणा होताच रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्षा कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला

मुंबई प्रदेश भाजप कार्यालयात केंद्रीय निरीक्षक किरण रीजुजू यांच्याकडे रवींद्र चव्हाण यांचा एकमेव अर्ज आल्यानंतर त्यांनी काल रवींद्र चव्हाण यांच्या प्रदेशअध्यक्ष पदासाठी नियुक्तीची घोषणा करतात जमलेल्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. खोपोली शहराच्या मध्यवर्ती कार्यालयाबाहेर

कार्यकर्त्यांनी पक्षाच्या जयजयकराच्या घोषणा दिल्या. त्यानंतर कार्यकर्त्यांनी उपस्थित नागरिकांना, दुकानदारांना लाडूचे वाटप केले. यावेळी महिला आघाडीच्या अध्यक्ष अश्विनी अत्रे, डॉक्टर बि के नागरगोजे, माझी शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, दिलीप पवार, युवा उद्योजक विक्रम साबळे, सुनील नांदे, संजय म्हात्रे, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, वामन दिघे, कीर्ती ओसवाल, सुप्रिया नांदे, सीमा मोगरे, भारती शहा इत्यादीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## बहिरोळे येथे आधुनिक तंत्रज्ञानाने भात लागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

सदयस्थितीत पाऊस चांगल्या प्रकारे पडत असून भात पिकाच्या लावणीच्या कामांना आता सुरुवात झाली आहे. अलिबाग तालुक्यातील बहिरोले गांवचे शेतकरी संदेश तुकाराम थळे यांनी आपल्या शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने वापर करुन भात शेती लागवड केली आहे.

शेतकरी संदेश थळे यांनी आपल्या शेतीमध्ये यांत्रिकिरणाचा वापर करुन भात शेती लागवड केली आहे. त्यांना साडेसात एकर भात पिक लावणी करण्यासाठी ९० मजुर लागत होते. ७ दिवस लावणीचे काम चालायचे. त्यासाठी ३६ हजार रुपये खर्च यायचा. यंत्राद्वारे लागवड केल्यामुळे दिड दिवसात लावगड पूर्ण झाली. १९ हजार रुपये खर्च आला.संदेश थळे यांनी यासाटी प्लास्टीक ट्रे मध्ये रोपवाटीका तयार केली होती.

> **शेतकऱ्यांनी भात लावणीसाठी जास्तीत जास्त यांत्रिकिकरणाचा वापर करावा. त्यामुळे मजुरांवरील अवलंबन कमी होऊन उत्पादनात खर्चात बचत होतेच तसेच वेळेतही बचत होते. त्यासाठी शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा**
>
> **–राजेश घरत, कृषि अधिकारी, अलिबाग**



## मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर केमिकल टँकर बोगद्यात उलटला



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवरील खोपोली एक्सिट जवळ केमिकल वाहून नेणाऱ्या टँकरने बोगद्याच्या भितींला जोरदार धडक दिल्याने टँकर रस्त्यावर पलटी होऊन भीषण अपघात झाला, या अपघातात टँकर मधील केमिकल गळती होऊन रस्त्यावर पडत होते,

मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवरून रणजीतशिंग गुरमितशिंग ओक (वय ३२, रा खार, मुंबई)हा पुणे येथून केमिकल टँकर घेऊन गुजरात कडे जातं असताना खोपोली एक्सिट जवळील बोगद्याला जोरदार धडक दिल्याने टँकर पलटी झाला असून, त्यातील केमिकल गळती होऊन रस्त्यावर पडत आहे, याची माहिती मिळताच आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, बोरघाट पोलीस, हेल्प फाउंडेशनचे सदस्य, मृत्यूजय दूत, आदी घटनास्थळी तात्काळ दाखल होत केमिकल एक्सपर्ट धनंजय गिध यांना बोलावून गिध यांनी केमिकल गळती बंद केली, तर रस्त्यावर पडलेल्या केमिकल वर माती आणि गिरीट टाकून थांबलेली वाहतूक चालू करण्यात सुरक्षा यंत्रणाला यश आले.

## आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन आयोजित रक्तदान शिबिरात ५४ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन स्थापना दिवसा निमित्त आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन कर्जत, रायगड यांच्या विद्यमाने समर्पण रक्तपेढी घाटकोपर याच्यां सहकार्याने कर्जत– खालापुर तालुक्यातील ५१५ वे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत, खालापूर तालुक्यातील ५१५ वे शिबीर ठरले.

श्री कपालेश्वर मंदिर सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन रायगड अध्यक्ष कैलास पोटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रथम रक्तदान कृष्णा तथा बाबू आंबवणे यांनी करून रक्तदानाचा शुभारंभ केला. याप्रसंगी किसान मोर्चा उपाध्यक्ष सुनिल गोगटे. राजाभाऊ कोठारी, सुनील भोपतराव, वैभव पेठे, प्रसाद पाटील. रामकिशोर गुप्ता, कल्याणी पोटे, स्नेहा गोगटे, रेखा गुप्ता, दर्पण गुप्ता, रणजित जैन, राजन चौधरी आदी उपस्थित होते.

पनवेलच्या विजय तांबोळी यांनी आपले १४० वे रक्तदान केले. तर कु. प्रथम आंबवणे याने आपले पहिले रक्तदान केले. समर्पण रक्तपेढी घाटकोपरच्या डॉ. अर्चंना पेडणेकर आणि डॉ.रमेश सिह यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदीप निनावे, लता देवक, अनिता कोराणकर, सुनीता निते, लक्ष्मण नाईक यांनी रक्त संकलनाचे काम केले.

## पेणमध्ये म्हाडा कॉलनी रस्त्यावर विजेचा पोल कोसळला; सुदैवाने जिवीत हानी नाही

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील म्हाडा कॉलनी व कुंभार आळी या परिसरात विजेचा पोल कोसळला. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच या परिसरतील सर्व्हिस वायरही तुटल्या होत्या. यामुळे बराच काळ या भागातील वीजपुरवठा खंडित झाला होता. त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह छोटे व्यावसायिक, दुकानदार, गणेश मूर्तिकार यांना मोठ्या प्रमाणात बसला. गेल्या दीड महिन्यापासून वीज कंपनीचा कारभार अत्यंत ढिसाळ व गलथान सुरू असून दिवसा–रात्री लाईट कधी जाईल, याचा



काही भरोसा राहिलेला नाही.

याबद्दल नागरिकांनी अनेक वेळा फोन करून सुद्धा पेणचे सहाय्यक अभियंता खोब्रागडे तसेच पेण शहरातील अभियंता यांना काहीच फरक पडत नाही. नागरिकांनी फोन लावला असता काम सुरू आहे, असेच उत्तर दिले जाते. त्यामुळे पेण शहरातील व तालुक्यातील जनतेत प्रचंड संताप व राग व्यक्त होत आहे.

## अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेच्या अर्जाबाबत आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिह्यातील प्रथम ०१ ते ०३ किंवा ०५ विद्यार्थ्यांना निधीच्या उपलब्धतेनुसार प्रोत्साहनपर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेचा लाभ दरवर्षी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येतो.

त्यानुसार मांग, मातंग, मिनी–मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील विद्यार्थी, विद्यार्थीनींनी दि.२० जुलै २०२५ पर्यंत महामंडळाचे जिल्हा कार्यालय, श्रीराम समर्थ गृहनिर्माण संस्था मर्या, सदनिका क्र.२, तळमजला, मारुती मंदिराच्या मागे चेंढरे, अलिबाग येथे प्रत्यक्ष अथवा पोष्टाव्दारे अर्ज सादर करावेत


### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. श्रावण रामा पाटील रा. मु. पाटणोली, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णनः**
**मौजे मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड**

| स.नं. | हिस्सा नं | क्षेत्र ( हे.आर. चौ.मी) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७७ | १ | ०–७०–००<br>पो.ख. ०–०३–००<br>एकूण ०–७३– ०० | ३.३१ |
| ७७ | ३ | ३–६७–००<br>पो.ख. ०–५४–००<br>एकूण ४–२१–०० | ११.३८ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक : ०२/०७/२०२५**

**सही/–**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**

पत्ताः– शॉप नं १३०, म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स पहिला मजला भाजी मार्केट जवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६
मो.नं. ८१०८५५८२८९

### कागदपत्रे हरविलेबाबत

मी, **सागर रोहीदास दाभणे** रा. बी ३०७, कावेरी सोसायटी, सेक्टर ४, खांदा कॉलनी, पनवेल ४१०२०६. जि. रायगड

माझेकडून खांदा कॉलनी – खांदेश्वर परिसरात प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी खांदेश्वर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. tcD3t3GSMI/२०२५, दिनांक १/०७/२०२५ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. शेअर सर्टिफिकेट नं. ०२३ (सर्टिफिकेट २१–०८–२००६)

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ८६५५७३०४२२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दिनांक : २/०७/२०२५

**सही/–**
**सागर रोहीदास दाभणे**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत १**) बाळाराम गोमा चौधरी, २) इंदुबाई बामा भोपी, ३) एकनाथ भागोजी चौधरी, ४) नीलम भागोजी चौधरी, व ५) कमळूबाई भागोजी चौधरी,** यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे– शिरढोण, ता– पनवेल, जिल्हा– रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र – हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | २ | ०–४४–३०<br>पो.ख. ०–०२–७०<br>एकूण ०–४७–०० | १०.४४ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०३/०७/२०२५**

**सही/–**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली,
उरण, रायगड पिन कोड– ४००७०२, मोबाईल नं. ७६६६०१०२९३

प्रोसेस जमा ता.

**मा. राठोड मॅडम**
**ॲड. इर्शाद शेख**
**पनवेल अर्जदारांचे वकील**

### जाहिर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, यांचे कोर्टात.....**
**दि.चौ.अर्ज.क.७९६/२०२५**
**नि. ८ ड**
**ने.ता. १९/८/२०२५**

१ ) दस्तगीर हुसेनमिया सुबेदार,
वय ५७ वर्षे, धंदा– शेती
रा. घर नं. ४९०, मु.पो. तळोजा,
ता. पनवेल, जि. रायगड
२) राजिया अ. रउफ तिधारे,
वय ५९ वर्षे, धंदा– शेती,
रा. घर नं. ७९५, इब्राहिम मस्जिद जवळ,
तळोजा मजकुर, ता. पनवेल, जि. रायगड
३) मोहम्मद नूर हुसैनमिया सुबेदार,
वय– ५४ वर्षे, धंदा– शेती,
रा. घर नं. २५९/१, मु.पो. तळोजा,
तळोजा मजकुर, ता. पनवेल, जि. रायगड
४) मो. हनीफ हुसेनमिया सुभेदार,
वय ४८ वर्षे, धंदा– शेती,
रा. घर नं. २५९/२, हरिजन वाडा जवळ,
तळोजा पाचनंद, ता. पनवेल, जि. रायगड
} अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार कं. १ ते ४ यांचे वडील पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार हे मौजे–तळोजा पाचनंद, ता. पनवेल, जि. रायगड येथे दिनांक ०७/०६/२०२० रोजी राहत्या घरी पैगंबरवासी झाले आहेत. अर्जदार यांची आई आणि पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांची पत्नी पै. फातीमा हुसेनमिया सुबेदार या देखील दि. ०६/११/२०१५ रोजी पैगंबरवासी झाल्या आहेत. पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांचे वडील पै. अलिमिया गुलामसाहब सुबेदार हे दि. २३/०८/१९५६ रोजी पैगंबरवासी झाले आहेत. पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांची आई खदीजा अलिमिया सुबेदार या देखील दि. १२/०७/१९९५ रोजी पैगंबरवासी झाल्या आहेत. पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांचे मृत्युपश्चात त्यांना मुस्लिम कायद्यांतील तरतुदींनुसार अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत.

दस्तगीर हुसेनमिया सुबेदार वगैरे हयांनी पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांच्या वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांचे नांवे मालकी हक्कांतील शेतजमिन मिळकतींचे मोबदल्यापोटी मे. सिडको लि., महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबवित असलेल्या १२.५ टक्के गांवठाण विस्तार योजने अंतर्गत वर नमुद भु संपादनापोटी मौजे–तळोजा नोड, येथे सेक्टर १४ मध्ये भुखंड कं. १२, क्षेत्र ४० चौ.मि. अशा वर्णनाचा भुखंड वितरीत केलेला आहे. सदरहू भुखंडाबाबत सिडको लि. यांनी पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांचे लाभांत दि. २९/०५/२०१५ रोजीचा भाडेपटटा करार लिहून दिलेला आहे. सदरचा भाडेपटटा करार मे. दुयम निबंधक पनवेल यांचे कार्यालयांत अनु.कं. पवल५/३५६४/२०२५ कडे दि. ०३/०६/२०१५ रोजी नोंदविण्यात आलेला आहे.

वर नमुद केल्याप्रमाण पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांचे मृत्यूपश्चात त्यांचे मालकीच्या मिळकतींमध्ये अर्जदार यांचा अविभक्त हिस्सा आहे.

वर दस्तगीर हुसेनमिया सुबेदार वगैरे हे पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट दस्तगीर हुसेनमिया सुबेदार वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर पै. हुसेनमिया अलिमिया सुबेदार यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली.

**सही/–** लिपीक, दिवाणी न्यायालय.क.स्तर पनवेल | शिक्का | **सही/–** सह. अधिक्षक, दिवाणी न्यायालय.क.स्तर पनवेल

### E-TENDER NOTICE

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**Tender Specification No.** Civil KGSC, Pophali /Rfx No.3000059215, 3000059216, 3000059218,3000059219,3000059220,3000059221/FY-2025-26.
**Name of work:** 06 Nos. of tenders are invited for various civil works & Repair & maintenance works at various locations in KGSC, Pophali.

**Sale start date: -** 03.07.2025 11.00 Hrs. to 23.07.2025 up to 17:00 Hrs.
**Submission Date :-** 24.07.2025 up to 15:00 HRS.

Kindly see the company's website https://eprocurement.mahagenco.in. For detailed tender notice.

**Contact person-** Executive Engineer (c), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai **Fax :** ( 022)26581469
**Tel.No.** 022-26474211 extn. 2590, 26472131

**Sd/-**
**Chief Engineer(C)-III, MSPGCL, Mumbai.**

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
### MORU NARAYAN MHATRE VIDYALAYA, GAVHAN KOPAR
**Plot No: 1, Ulwe Node, At Post : Gavhan Kopar. 410 206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026 (FOR SELF FINANCE PROGRAMME)**

**Full time Assistant – Teacher for the Academic Year – 2025-2026. On Purely Temporary for one year basis for the following subjects**

| SR. NO | SECTION | TITLE OF POSTS | SUBJECTS / SECTIONS | QUALIFICATIONS | NO OF POSTS |
|---|---|---|---|---|---|
| 01 | PRE-PRIMARY | ASST-TEACHER | B.A. ECC Ed | B.A. E.C.C. Ed | 01 |
| 02 | PRIMARY | ASST. TEACHER | ENGLISH & S.S.T. | B.A. B.Ed. | 01 |
| 03 | PRIMARY | LIABRARIAN | LIABRARIAN | B.A. B.LIB M.LIB | 01 |
| 04 | SECONDARY | ASST TEACHER | MATHEMATICS | M.Sc. B.Ed | 01 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot No: 1, Ulwe Node, At Post : Gavhan, Kopar. Tal : Panvel, Dist : Raigad. 410206.** Candidates may submit the application by email to **mnmv.primary@gmail.com** on or before **Monday 14/07/2025**

**If required Contact :**
1. MRS SAYLI WADWALKAR ( I/C Principal) - 7738397656
2. MRS. CHAITALI KADU – 9773323876

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
### SMT. BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA, DRONAGIRI
**Plot no.60/61, Sector- 12, Tal: uran. Dist: Raigad. -400 707.**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026 (FOR SELF FINANCE PROGRAMME)**

**Full time Assistant – Teacher for the Academic Year – 2025-2026. On Purely Temporary for one year basis for the following subjects**

| SR. NO | SECTION | TITLE OF POSTS | SUBJECTS / SECTIONS | QUALIFICATIONS | NO OF POSTS |
|---|---|---|---|---|---|
| 01 | PRIMARY & SECONDARY SECTION | ASST-TEACHER | Physical Educator | B.A. B.P.Ed. | 01 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no: 60/61, Sector-12, Dronagiri Node Tal: Uran . Dist: Raigad. 400 707.** Candidates may submit the application by email to **bctvidyalaya@gmail.com** on or before **Monday 14/07/2025**

**If required Contact No.**
1. MRS. KATHE ANURADHA ( I/C HEAD MISTRESS) - 9819212918
2. MRS. PATIL SNEHAL - 9594964872

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

# निवडक

## कारच्या अपघातात दोघे जखमी

**पनवेल :** दोन कारच्या झालेल्या अपघातात दोन जण जखमी झाले. या प्रकरणी कारचालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. लविष बसंताणी हे उल्हासनगर येथे राहत असून दोन जून रोजी ते त्यांच्या बहिणीसोबत महाबळेश्वर येथून होंडा अमेझ गाडीने निघाले. पुणे मुंबई एक्सप्रेस वेने जाताना चिखले गाव किलोमीटर ७.२०० या ठिकाणी पाठीमागून आलेल्या मारुती एक्सेल गाडीने ठोकर दिली. या अपघातात होंडा अमेझ गाडी दुभाजकावर धडकून अपघात झाला. त्यात गाडीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले तसेच लविष आणि बहिण सिमरन हे जखमी झाले. त्यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांनी २९ जून रोजी गुन्हा दाखल केला.

## सुषमा वाकचौरे यांना पुरस्कार

**नवी मुंबई :** बी द चेंज फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित



राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार समारंभ साई पालखी निवास, शिर्डी येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या पुरस्कारासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे १३०० शिक्षकांनी अर्ज केला होता. नवी मुंबईतील शिक्षकांना देखील यात पुरस्कार प्राप्त झाला. नवी मुंबई सिवुड्स येथील शिक्षिका सुषमा वाकचौरे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला. पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## लोकसेवा आयोगावर सदस्यांची नियुक्ती



**नवी मुंबई :** राज्यशासनाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगावर (MPSC) राजीव निवतरकर, दिलीप भुजबळ-पाटील व महेंद्र वारभुवन तीन नवीन सदस्यांची नियुक्ती करण्यात आली असून, राजीव निवतकर आणि महेंद्र वारभुवन यांनी आज सदस्य पदाची आणि गोपनीयतेची शपथ घेतली. आयोगाचे अध्यक्ष रजनीश सेठ यांनी नवीन सदस्यांना शपथ दिली. आयोगाच्या बेलापूर, नवी मुंबई येथील मुख्यालयात हा शपथविधी सोहळा पार पडला. या प्रसंगी आयोगाचे सदस्य अभय वाघ आणि सतिश देशपांडे यांच्यासह आयोगाच्या सचिव सुवर्णा खरात, सहसचिव तथा परीक्षा नियंत्रक सरीता बांधेकर-देशमुख, उपसचिव मा. पां. जाधव हे उपस्थित होते.

## अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान

**नवी मुंबई :** महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या १३ नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांचा महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झालेल्या सेवानिवृत्ती सन्मान समारंभप्रसंगी महापालिका सचिव चित्रा बाविस्कर व अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत यथोचित सन्मान करण्यात आला. या वेळी अधिकारी, कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटूंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापारेषणचा वर्धापन दिन उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** महापारेषण कंपनीच्या स्थापनेला २० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त छत्रपती संभाजीनगर परिमंडळात २७ जून २०२५ रोजी महापारेषणचा २० वा वर्धापनदिन आणि पारितोषिक वितरण समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात मोठ्या उत्साहात झाला. महापारेषण कंपनीचे अध्यक्ष संजीव कुमार, अधीक्षक अभियंता संजीव कुमार सुरडकर, संजीव कांबळे, रंगनाथ चव्हाण, अंजना ठक्कर, जाधव, मंजुषा दुसाने, प्रविण यशवंते आदी उपस्थित होते.

## शिवसह्याद्री पतपेढीचा वर्धापन दिन

**उरण :** शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित संस्थेला ३५ वर्षे पूर्ण झाली व उरण शाखेला नऊ वर्षे पूर्ण झाली त्याचे औचित्य साधून मंगळवारी वर्धापन दिन साजरा करण्यात आला. उरण शाखा १ जुलै १९९१-१९९२ स्थापन झाली. वर्धापन दिना निमित्त, उरण शाखेचे सल्लागार प्रकाश म्हात्रे, पत्रकार राजा कडू, पत्रकार दिनेश पवार, दिव्या नाइक, मनीषा पाटील व अधिकारी वर्ग यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. या वेळी पत्रकार दिनेश पवार, विभागीय अधिकारी रायगड विभाग मनीष भानसे, उरण शाखा व्यवस्थापक रेश्मा सचिन भोसले, विकी कदम, सविता घुतुकडे, कुमार सोंडकर, भारत भोईर, पंढरीनाथ कोळी, संतोष पानसकर, सुरेखा माळी, विजय कांबळे, महादेव ठाकूर आदी उपस्थित होते.



# चांगल्या शिक्षणाद्वारे उज्ज्वल यश संपादन करा

## भाजप ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांचा विद्यार्थ्यांना सल्ला; न्हावे येथे मोफत वह्या वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षणाशिवाय कोणताही पर्याय उरला नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन उज्ज्वल यश संपादीत करावे, असा मोलाचा सल्ला भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी न्हावे येथे वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी दिला. सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात गेली तीस वर्षे उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड २ यांच्या संयुक्त विद्यमाने न्हावे आणि न्हावेखाडी गावातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम बुधवारी (दि.२) झाला.

या अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या न्हावे आणि न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यामना वह्यांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाला असून त्यांनी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, भाजप नेते हेमंत ठाकूर, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, सदस्य सागर ठाकूर, योगिता भगत, विश्वनाथ कोळी, उद्योजक चंद्रकांत भोईर, उलवे नोड २चे उपाध्यक्ष अनंता ठाकूर, सी.एल.ठाकूर, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, अरुणशेठ ठाकूर, राजेश म्हात्रे, शैलैश पाटील, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, मंजूषा ठाकूर, प्रकाश कडू, मिनाक्षी पाटील, श्रीधर मोकळ, वामन म्हात्रे, सुदर्शन भगत, सुहास भगत, प्रमोद कोळी, विनायक कोळी, ललिता ठाकूर, स्नेहलता ठाकूर,राम मोकल, संजना पाटील, स्वप्ना भोईर, रेश्मा ठाकूर, सदाशिव ठाकूर, नामदेव बांगर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.




## पोलीस आयुक्तालयात सर्प जनजागृती

### पुनर्वसु फाउंडेशनचा उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी बेलापुर येथील पुनर्वसु फाउंडेशनतर्फे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, सीबीडी बेलापूर येथे विशेष सर्प जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाचे आयोजन वन्यजीव व सर्प संरक्षण या उद्देशाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमात पुनर्वससु फाउंडेशनचे संस्थापक प्रितम भुसाणे व त्यांचे सहकारी सारंग येरणे, अष्टविनायक मोरे, शारोन सोनावणे आणि तुषार चव्हाण यांनी सहभाग घेतला. या सर्वांनी सर्पांविषयी चुकीच्या समजुती व संभ्रम तसेच त्यांच्या वर्तणुकीचे स्वरूप, विषारी व बिनविषारी साप यातील फरक, तसेच साप चावल्यास कोणते उपाय व प्रथमोचार कसे करावेत? व कोणत्या बाबी टाळावेत याबाबत मार्गदर्शन केले. जनजागृती सत्रात दंगल नियंत्रण पथकाचे शांताराम बबन वाघमोडे राखीव पोलिस निरीक्षक, एपीआय राजेश खांदवे व पीएसआय सागर पवार यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाकरिता क्विक रिऍक्शन टीम व रायट कंट्रोल पोलीस यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमात सर्पमित्र कडून प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. ज्यामध्ये साप पकडण्याचे योग्य तंत्र, सुरक्षा खबरदारी व आपत्ती काळातील योग्य प्रतिसाद कसा द्यावा याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले. पुनर्वसु फाउंडेशन आणि नवी मुंबई पोलीस आस्थापना यांच्यातील ही सहकार्याची सुरुवात भविष्यातील वन्यजीव संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे या कार्यक्रमाच्या समारोपात नमूद करण्यात आले.

## मीटर रूममध्ये लपलेल्या घोरपडीची सुटका

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापुर गावात एक सोसायटीत वीज मीटर रूममध्ये लपलेल्या घोरपडीची सुटका करण्यात प्राणीमात्रांना यश आले आहे. तब्बल २ ते ३ फुटांची ही घोरपड होती. तिची सुटका करून तिला निसर्गाच्या सान्निध्यात सोडून देण्यात आले.

पुनर्वसु फॉउंडेशनला सी.बी.डी, बेलापूर गावात राम मंदिराजवळ असलेल्या सोसायटीमध्ये एक भली मोठी घोरपड असल्याची माहिती तेथील नागरिकांनी फोन वरून दिली. घटनेची माहिती सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांना देण्यात आली. अष्टविनायक यांच्यासह प्रीतम भुसाणे व शशांक व सहकारी मित्र अपेक्षा जाधव व सृष्टी यांना घेऊन घटना स्थळी पोहचले. तेथे जाऊन शोधमोहीम राबविण्यात आली. त्यावी तेथील वीज मिटर रूममध्ये लाद्यांच्या खाली घोरपड आढळली. वीज मीटरमध्ये असलेल्या लाद्या काढून घोरपडीला अलगद बाहेर काढले.

कोणतीही दुखापत न होता तिची तपासणी करून घोरपडीला निसर्गाच्या सान्निध्यात सोडण्यात आले. सरपटणारे प्राणी आढळल्यास न घाबरता, त्यांना न मारता जवळील सर्पमित्राला बोलवा. सर्पमित्र येऊन सापाला सुखरूप रित्या पकडून त्यांच्या अधिवासात म्हणजेच जंगलात सोडून देतील, असे मोरे यांनी सांगितले.



## दिवाळे कोळीवाड्यात दंत चिकित्सा शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**



वाढत्या वयानुसार लहान मुलांसह नागरिकांमध्ये दातांच्या अनेक समस्या निर्माण होत असतात. त्यामुळे योग्य उपचार व्हावेत यासाठी के. के ग्रुप यांच्या सहयोगाने 'एज कॉन्सेप्ट डेंटल अँड असँटिक सेंटर' सिवूड नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळे कोळीवाडा येथील स्वाध्याय परिवार समाज मंदिरात रविवारी (दि.२९) रोजी, दंत तपासणी व दातांची काळजी घेण्यासंदर्भात मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या वेळी, चांगले दात, मौखिक आरोग्य व योग्य आहार याचा मानसिक तसेच शारीरिक आरोग्याच्या विकारावर होणार परिणाम, दात योग्य प्रकारे घासण्याच्या प्रात्यक्षिकासह समजावून सांगण्यात आले. प्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. स्वप्नील भागवत, डॉ. जयश्री भागवत आणि डॉ. स्नेहा डांगरे यांच्यासह त्यांचे सहकारी डॉक्टरांनी एकूण ७७ नागरिकांची योग्य तपासणी करून नियमितपणे व योग्य पद्धतीने दातांची स्वच्छता न केल्यास आजार निर्माण होतात. दात किडणे, तोंडाला वास येणे, हिरड्यांमधून रक्त येणे, दात दुखणे यांसारखे आजार होऊ शकतात या संदर्भात मार्गदर्शन केले.

दरम्यान, आपले मुख हे आपल्या आरोग्याचे प्रवेशद्वार आहे आणि दातांचे आरोग्य उत्तम असेल, तर चर्वणाबरोबरच सुरू होणारी पचनप्रक्रिया ही आपल्या आरोग्यासाठी हितकारक असल्याचे डॉ भागवत यांनी सांगितले. या दंत चिकित्सा शिबिराला प्रसिद्ध डॉ. स्वप्नील भागवत, डॉ. जयश्री भागवत, डॉ. स्नेहा डांगरे, के. के. ग्रुपचे अध्यक्ष सुखदेव रामदास कोळी, जेष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष अंकुश नलावडे, विजय कोळी, देवनाथ कोळी, हरिचंद्र कोळी यांच्यासह परिसरातील मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.

## मोहोपाडा महिला उद्योग मंडळाच्या विद्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिकेचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लायन्स क्वेस्ट हा उमलतं वय आणि किशोरांसाठी सकारात्मक कौशल्ये चारित्र्यसंवर्धनासाठी आणि जबाबदार नागरिकत्वासाठी जीवनावश्यक कौशल्यांचा विकास बदल आणि आव्हाने यासंबंधी सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिका मोफत वाटप तर पालकांसाठी कार्यशाळा मार्गदर्शन पुस्तिका वाटप कार्यक्रम पार पडला. हा कार्यक्रम लायन्स क्लब आफ पनवेल यांच्यावतीने मोहोपाडा येथील महिला उद्योग मंडळ प्राथमिक शाळेत घेण्यात आला.

लायन्स क्वेस्ट हा सर्वसमावेशक आणि सार्वत्रिक पुराव्यावर आधारित सामाजिक आणि भावनिक असा शिक्षण कार्यक्रम आहे.या शैक्षणिक कार्यक्रमाद्वारे विध्यार्थ्यां मधील नकारात्मक वागणूक कमी होते आणि सकारात्मकता वाढवते. वर्तणूक संबंध निर्माण करण्यासाठी



किशोरवयीन मुलांवर सकारात्मक प्रभाव शैक्षणिक श्रेणींमध्ये सुधारणा अभ्यासाकडे चांगली प्रेरणा शाळा अणि कुटुंबाशी मजबूत संबंध या शैक्षणिक कार्यक्रमा द्वारे होते.

लायन्स क्वेस्ट या कार्यक्रमाध्ये विद्यार्थीच्या सर्वांगीन विकासासाठी दोन कार्यक्रम आहेत.पहिला कार्यक्रम स्कील फॉर ग्रोईंग हा पहिली ते पाचवी इयत्ता शिक्षण घेणाऱ्या विध्यार्थ्या साठी तर दुसरा कार्यक्रम स्कील फॉर अँडोलसन्स हा सहावी ते आठवी इयत्ता मध्ये शिक्षण घेणाऱ्या विध्यार्थ्यांसाठी असून लायन्स क्वेस्ट या प्रोग्रॅममध्ये मुख्य : विदयार्थी, शिक्षक, पालक आणि समाज या सर्वांना एकत्रित करून आताचा विद्यार्थी उदयाचा उत्तम नागरिक कसा होईल, याकडे लक्ष दिल जाते आणि तो कोणत्याही वाईट मार्गाला जाऊ नये म्हणून खालील कौशल्ये कशी आत्मसात केली जावीत याचे विस्तृत मार्गदर्शन या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना लायन्स क्लब आफ पनवेल यांच्या कडून करण्यात आले.

या वेळी महिला उद्योग मंडळ प्राथमिक शाळा मोहोपाडा यांच्या वतीने लायन्स क्लब आफ पनवेलचे अध्यक्ष एस जी चव्हाण, प्रमुख पाहूणे किशोर शेलके, जी एमएचआर मिट्सू चेम प्लास्ट एल टी डी अँड चेअरमन रायगड चॉप्टर, सोमेश्वर काळे जी एम बॉम्बे डाईगं, लायन सूयोग पेंडसे, लायन गायत्री साटम डी सी लायन क्वेस्ट, अशोक गील्डा सेक्रेटरी, प्रमोद गजहंस, अनुराधा खरपे, सुनीता कराड, मुख्याध्यापक, महादेव पाटील सरोजनी साजवान, शारदा दराडे सुनंदा कुलकर्णी, ललीता गोडसे सुनीता कराडे यांचा या वेळी पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

तदनंतर लायन्स क्लब आफ पनवेलचे अध्यक्ष एस जी चव्हाण, गायत्री साटम यांनी उपस्थितांना लायन्स क्वेस्ट विषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे आभार लायन अशोक गील्डा यांनी मानले तर कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन ललीता गोडसे यांनी केले.

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये एनआयसीयू केंद्र सुरू

**पनवेल : वार्ताहर**

खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सने नवजात शिशूंच्या आरोग्य समस्यांवर उपचार करण्यासाठी सुसज्ज व अद्ययावत असे निओनेटल इन्टेन्सिव्ह केअर युनिट (एनआयसीयू) सुरू केले आहे. या निओनेटल इन्टेन्सिव्ह केअर युनिटसह (एनआयसीयू) 'ओपन हाऊस व्हिजिट महिला आणि बाल विभाग' याचे उद्घाटन करण्यात आले. या एनआयसीयूमध्ये सर्वाधिक जोखीम असलेल्या बाळांवर उपचार करण्यात येणार आहेत.

गर्भधारणेदरम्यान गर्भवती मातांना अनेकदा उच्च रक्तदाब, गर्भावस्थेतील मधुमेह किंवा अकाली प्रसुती यासारख्या अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते, तर अकाली जन्मलेल्या तसेच जन्माजात दोष असलेल्या नवजात शिशुंना श्वासोच्छवासाच्या समस्या, संसर्ग किंवा कमी वजनासारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. जन्मजात दोष असलेल्या बाळांना तसेच आधुनिक वैद्यकिय उपचार व देखरेखीची गरज असलेल्या नवजात शिशूंसाठी हे विशेष युनिट नक्कीच फायदेशीर ठरणार असून यामाध्यमातून यशस्वी उपचार केले जातील, अशी प्रतिक्रिया वरिष्ठ प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. कल्पना गुप्ता यांनी व्यक्त केली.

## नवीन पनवेलमध्ये क्रेझी मान्सून फेस्ट २०२५ उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परिणीता इव्हेंट्स प्लॅनर्सने ग्रेसफुल हँड्स ट्रस्ट आणि देव क्टिंग अँड मॉडेलिंग अकेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रेझी मान्सून फेस्ट २०२५ थीम अंतर्गत फॅशन शो, नृत्य स्पर्धा आणि लाइफस्टाइल प्रीमियम प्रदर्शन मोठ्या उत्साहात शगुन हॉटेल नवीन पनवेल येथे आयोजित केले.

सुश्री पायल मधोक, नॅन्सी कुकरेजा यांनी आयोजित केलेल्या फेस्ट मध्ये विशेष पाहुण्या डॉ. निवेदिता श्रेयांस प्रमुख पाहुणे, अनुज्ञा सोमवंशी कोरिओग्राफर, राशा किरमाणी, अभिनेता आणि मॉडेल, किरण वाघचवरे, कोरिओग्राफर, सिद्धार्थ साळवी, चित्रपट दिग्दर्शक, किरण राजपूत, मॉडेल, गुरमीत सिंग गन्हा, सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आणि ग्रूमिंग एक्सपर्ट, बालाजी दीपिका, पी.डी. डब्ल्यु., अँकर पायल एम, सुमा ललित आणि मनजीत कौर, मिलिंद राणे समर्थित, अथर्व ट्रॅव्हल्स ओनर, ईशेवा ब्रँड, कोसवेदिक वेलनेस, मल्होत्रा अँड सन्स डिझायनर्स, स्केच स्टुडिओ आदी कार्यक्रमास उपस्थित होती.



कार्यक्रमाची सुरुवात स्पर्धेत विजेत्या ठरलेले शनाया शेबे (लिटल चॅम्प), डॅनिश स्टाईल (बेस्ट चॅम्प) इमेलिंग स्टाइल (मॅटर स्टाईल) यांच्या यांच्या मनोगताने झाली. विजय पाटील, उपविजेत्या राजनंदी धुमाळसह, अयंश गणपते, ऋषिका सिंग, ऐश्वर्या, स्वामिनी मंगळागौर गट (किरण एस. अधागळे) नृत्यात प्रथम उपविजेते आणि मिताली म्हात्रे नृत्यात द्वितीय उपविजेते यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवितण्यात आले.

मुलांच्या आनंदासाठी आयोजकांच्या समर्पणाचे प्रदर्शन करणारा फॅशन शो आणि नृत्य स्पर्धेत मुलांचा उत्साही सहभाग हा हृदयस्पर्शी क्षण होता. डॉ. निवेदिता श्रेयांच्या आभारप्रदर्शनाने समारंभाचा समारोप झाला, त्यानंतर परिणीता टीमने भविष्यातील आणखी रोमांचक कार्यक्रमांसाठी पुन्हा एकत्र येण्याच्या संकल्प केला.

# रोहा बस स्थानकाची दुरवस्था; डागडुजीची मागणी

## प्रवेशद्वारातच खड्डे; पावसाळ्यात बनताहेत पाण्याचे डबके

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या रोहा बस स्थानकाचे दुरवस्था झाल्याचे दिसून येते. बस उभे राहण्याचे ठिकाण वगळता अन्य ठिकाणी उद्भवलेल्या समस्या राज्य परिवहन महामंडळाने सोडवण्याची आवश्यकता आहे.

रोहा तालुक्याचे ठिकाण असलेल्या रोहा शहरात बस स्थानक असून या बस स्थानकातून मुंबई, पुणे, अलिबाग व महाडकडे अनेक प्रवासी प्रवास करत असतात. तालुक्याचे ठिकाण असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी, छोटे, व्यावसायिक, सरकारी अधिकारी व प्रवासी कामानिमित्ताने रोहा शहरात येत असतात. नेहमीच रोहा बस स्थानक गजबजलेले असते.

हे बस स्थानक खाजगीकरणातून बांधलेले आहे. बस स्थानकाच्या इमारतीमध्ये व्यावसायिक गाळे आणि बस स्थानक अशी या बस स्थानकाची रचना आहे.





पावसाळा सुरू झाला आहे. पाऊस पडत असल्याने रोहा बस स्थानकाचे छत गळत आहे. त्यामुळे बस स्थानकाच्या इमारतीच्या आवारात व बसण्याच्या ठिकाणी सर्वत्र ओलावा दिसुन येत आहे.बस स्थानकातील बसण्याचे ठिकाण ही ओले झाल्याचे दिसून येत आहे. तालुक्याचे ठिकाण असल्याने कामा निमित्त व परगावी जाण्यासाठी निघालेल्या प्रवाशांवर पाण्याचा शिडकाव होताना दिसत आहे. बस स्थानकात प्रवेश करत असलेल्या कोलाड बाजूच्या ठिकाणी मोठा खड्डा असल्याने पाण्याचे डबके झाले आहे. त्यामुळे प्रवाशांना व वाहनांना आत येताना पाण्यातून यावे लागत आहे. दुसरीकडे बस स्थानकाच्या आवारात खाजगी चार चाकी व दुचाकी गाड्यांचे पार्किंग मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.

महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाकडुन बस स्थानक स्मार्ट करण्याचे धोरण असताना रोहा बस स्थानकाची दुरावस्था झाल्याचे दिसून येत आहे.

प्रवासांचे हित लक्षात घेऊन रोहा बस स्थानकाचे छत गळती थांबवण्याची आवश्यकता आहे. दुसरीकडे बस स्थानकातील उर्वरित काम लवकर केल्यास सोयीचे होणार आहे.

# बेकरे गावात गावठी हातभट्टीवर पोलिसांची कारवाई

## सात जणांना रंगेहात पकडले

**नेरळ: प्रतिनिधी**

नेरळ पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांच्या पोलिस टीमने गावठी हातभट्टी विरोधात धडक कारवाई केली आहे.माथेरानच्या घनदाट जंगल परिसरात लावलेल्या दारूच्या भट्टीवर नेरळ पोलिसांनी रात्री १२ वाजता छापा टाकून ती उद्ध्वस्त करीत सात जणांना ताब्यात घेतले आहे.

माथेरानच्या पायथ्याजवळ बेकरे गावाला लागून घनदाट जंगल परिसरात एका डोहाच्या शेजारी ही दारू बनवली जात होती,जिथे दिवसा उजेडात चालत जाणे माणसाला कठीण होते तिथे गावठी हातभट्टी धारक दारू उत्पादित करीत होते.दरम्यान अशा ठिकाणी नेरळ पोलिस निलेश वाणी आणि पोलिस सहकारी गुप्तता पाळत जागेवर पोहचले.भयाण अंधारात चोर शिपाईचा डाव सुरू झाला होता.पोलिसांच्या हातात टॉर्च असून सुद्धा ती चालू करता येत नव्हती एवढी पोलिसांनी खबरदारी घेत पाणी,दगड गोटे जगलं तुडवत अंधारात हात भट्टीच्या ठिकाणी चोहोबाजूने दबा धरून बसले होते. गावातील सात तरुण हे हातभट्टीच्या ठिकाणी पोहचले असताना पोलिसांनी घेराव घालून त्यांना रंगेहात पकडले.नेरळ पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे हे देखील त्या ठिकाणी दाखल होते.

सुरुवातीला विक्री साठी घेऊन जाणारी तयार दारू पोलिसांनी नष्ट केली,शिवाय दारू बनवण्यासाठी लागणारे साहित्य त्याच बरोबर रसायन नष्ट करून टाकण्यात आले.भले मोठे पातेले,ड्रम,पत्राची टाकी,मोटार,सर्व साहित्य पोलिसांनी जप्त केले असून सात जणांना बेड्या ठोकल्यात,गावाच्या बाहेर जंगल परिसरात काही गावातील टोळक्यांनी पोलिसांच्या डोळ्यात धूळ चारून अवैध्य दारू व्यवसाय सुरू केल्याने ढवळे यांनी गावात धाड सत्र सुरू केले होते सलग दोन दिवस हे कार्य पोलिस करीत असताना रात्री १२ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी तिसरी मोठी कारवाई करीत आरोपींना ताब्यात घेतले.



# कृषी दिन आणि वसंतरावजी नाईक यांची जयंती साजरी

**प्रतिनिधी : म्हसळा**

१ जुलै रोजी कृषी दिन म्हणजे दिवंगत मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांची जयंती केशवराव खांबेटे वाचनालयांत साजरी करतानाच हिमालय मुकुटस्थानी असलेल्या आणि समुद्र मातेचेपाय धुवत असतो आसा भाव होणारा तेजस्वीआशा भारतमातेची प्रतिमा आणि १९६२ ते १९७५ या दीर्घ कालावधीसाठी महाराष्ट्राला लाभलेले मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक हरित क्रांतीचे जनक, या दोन्ही प्रतिमाना आम्हा म्हसळा कराना आभिवादन करण्याची संधी मिळणे हा आम्हाला दुग्ध शर्करा योग आसल्याचे म्हसळा तालुक्याचे माजी सभापती महादेवराव पाटील यानी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे जयंती निमित्त केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाचे सभागृहात कृषीदिन साजरा करताना सांगितले.



या वेळी माजी सभापती महादेव पाटील यांच्याहस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला तर दिपाली पालवे यांनी भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले,यावेळी वाचनालयाचे माध्यमातून .कृषि घटक, छंद शेतीचा , स्वीय शेती, बांधावरती वृक्षारोपण, ऊस विज्ञान, निसर्ग शेती, पिकांचे एकात्मिक रोगनिवारण, महाराष्ट्रातील फळझाडे, निसर्ग शेती–नवी दृष्टी, भारतीय शेतीचे अर्थ कारण , शाश्वत शेतीच्या दिशेने, भाजीपाला लागवड, लवंग आणि काळी मिरी इत्यादी पुस्तकांचे प्रदर्शन भरविले होते.

या वेळी संजयकुमार शिंदे ,एन . जी. जामकर वाचनालयाचे सचिव अशोक काते, पर्यवेक्षिका रूपाली वारुळे कृषी सहाय्यक के.डी. मोहळकर, आर.बी. झडे, व्ही.सी. सोनावणे,दि. ए .चाटे, ए. एम . सानप, निलेश यादव, परशुराम नात्ती,अंगणवाडी सेविका योगिता जाधव ग्रंथपाल उदय करडे, प्राची मेंदडकर आदी उपस्थित होते.

# नागोठण्यात खासदार तटकरे यांच्या वाढदिवसाची तयारी

**नागोठणे : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदार संघांचे खासदार सुनिल तटकरे यांच्या १० जुलै रोजी होणाऱ्या ७० व्या वाढदिवसाची नागोठणे शहर व विभागातील कार्यकर्त्यांनी मोठया स्वरूपात साजरा करण्याची जय्यत तयारी केली असून ७ जुलै, ८ जुलै व ९ जुलै रोजी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना फळे, चादर, ब्लँकेट वाटप करण्यात येणार असून नागोठणे जिल्हा परिषद मतदार संघातील राष्ट्रवादीची सत्ता असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयात विविध प्रकारे लोकपयोगी कार्यक्रम तसेच गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय अध्यक्ष संतोष कोळी व शहर अध्यक्ष बाळासाहेब टके यांनी पत्रकारांना दिली

खासदार सुनिल तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृषी दिनानिमित्त कृषी उद्योजकांसह प्रगतीशिल शेतकऱ्यांचा सन्मान

**मुरूड: प्रतिनिधी**

हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्ताने मुरुड तालुका पंचायत समिती व मुरुड तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात कृषी दिनी तालुक्यातील युवा उद्योजकांसह प्रगतीशिल शेतकऱ्यांचा प्रशस्तीपत्रे व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.



प्रारंभी स्व .वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.यावेळी मुरुड तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ,सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील , प्रशासन अधिकारी संजय वानखेडे, प्रा . मेघराज जाधव ,माजी कृषी अधिकारी डी. के. पाटील,विस्तार अधिकारी संजय शेडगे,वसंत दळवी, प्रार्थना भोईर,शिवसेनेचे तालुका बांधकाम संघटना अध्यक्ष दिनेश मिनमिने ,राजपुरी जिल्हा परिषद गणाच्या संपर्क प्रमुख जिविता मिणमिणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संजय वानखेडे म्हणाले की, स्व. वसंतराव नाईकयांनी देशातील शेतकऱ्यांचे जीवन उंचावण्यासाठी कृषी विद्यापीठे उभारून हरितक्रांती घडविली. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा सर्वप्रथम नाईक यांनी पुरस्कार केल्याचे वानखेडे यांनी सांगितले. सहाय्यक गट विकास अधिकारी मंगेश पाटील .विकसित तंत्र वापरून पुन्हा युवकांनी शेतीकडे वळावे असे आवाहन केले .

# शेतीसाठी ड्रोनचा वापर करावा -जिल्हाधिकारी जावळे

**अलिबाग : प्रतिनिधी**

अत्याधुनिक यंत्राच्या साहाय्याने शेती करणे सोप्पे झाले आहे. द्रोण द्वारे शेतात फवारणी केल्याने वेळेची बचत होत आहे. त्यामुळे शेती करण्यासाठी शेतकऱ्यांनी द्रोणचा वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

रायगड जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व रायगड जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुक्यातील वाडगाव ग्रामपंचायतीमध्ये मंगळवारी (दि.१ ) कृषिदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी किशन जावळे उपस्थित होते. रायगड जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा कृषि अधिकारी वंदना शिंदे, वडगाव ग्राम्पांच्यायतिचा सरपंच सारीक पवार, वडगावचे उप सरपंच जयेंद्र भगत, जिल्हा परिषद कृषि विकास अधिकारी महेश नारायणकर, जिल्हा कृषि अधिकारी निकिता सुर्यवंशी , पंचायत समिती अलिबाग कृषि अधिकारी राजेश घरत आदी या कार्यक्रमास उपस्थित होते.



आंब्याला मोहोर येतो तेव्हा ओलावा असल्यामुळे मोहरला बुरशीजन्य रोग होतो आणि कीटकांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे आंबा पिकाचे नुकसान होते. आंबा मोहरावर फवारणी करताना अनेक अडचणी येतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी द्रोणद्वारे फवारणी करावी. द्रोण उपलब्ध कौन देण्यासाठी नियोजन विभागाकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले.द्रोण उडवून फवारणी कशी करायची याचे प्रात्यक्षिक दाखवले.

# शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचे अवलंबन करावा : प्रा.आरेकर

**रोहे : प्रतिनिधी**

कृषी विद्यापीठ हे शिक्षण, संशोधन व विस्तार यावर काम करीत आहे. कृषी विद्यापीठाने भरपुर संशोधन केले आहे.त्याचा लाभ शेतकऱ्यांनी घेतले पाहिजे. लागवडीसाठी शेतकऱ्यांनी बीयाणे योग्य घेणे आवश्यक आहे. वेगवेगळे उत्पादन घेतले पाहिजे. शेतकऱ्यांनी प्रयोगशील राहणे आवश्यक आहे.आज देश अन्नधान्यात परीपुर्ण आहे.परंतु आज शाश्वात अन्न महत्वाचे आहे.काळारुपाने व वातावरण बदलानुसार शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान अवलंबन केले पाहिजे असे प्रतिपादन प्रा.जीवन आरेकर यांनी केले आहे.



हरीत क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त पंचायत समिती रोहा व महाराष्ट्र शासन कृषी विभाग रोहा यांच्यावतीने कै.दत्ताजीराव गणपत तटकरे साभागृहात कृषीदिन आयोजित कार्यक्रमात प्रा.आरेकर बोलत होते.

यावेळी तालुका कृषी अधिकारी महादेव करे, पंचायत समिती कृषी अधिकारी रणजीत लवाटे, वारगे, झुरे, शिर्के मॅडम, शिंदे मॅडम, दिलीप पाबरेकर, अर्चना पाटील, सरपंच काळे, जितेंद्र जोशी, सुशील रेळेकर, ठोसर, संतोष दिवकर, खेळु थिटे, प्रसाद दगडे, अनंत मगर, दगडु बानुगडे, मुटके, किरण मोहीते, विनायक धामणे, चंद्रकांत लोखंडे, सारीका दिघे, रत्नदिप चावरेकर, रक्षित देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी जागतिक महायुद्धा नंतर अन्नधान्याचा तुटवडा फार मोठ्या प्रमाणात होत होता. त्यावेळी उपाय योजना करण्यासाठी देशपातळीवर धोरण आखण्यात आले. महाराष्ट्रात शेतीक्षेत्रात विविध वाण, प्रयोग करीत त्यावेळी तात्कालिन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी शेतीक्षेत्रात प्रगती करुन हरीत क्रांती आणली.

यावेळी रोहा तालुक्यात शेतकरी कंपनी स्थापन केल्याचेही सांगितले.जितेंद्र जोशी यांनी शेतीचे क्षेत्र कमी झाले. परंतु उत्पादन वाढले आहे. उत्पादीत मालाला बाजारपेठ व भाव मिळण्यासाठी मार्गदर्शन शेतकऱ्यांना केले पाहिजे. काढणीनंतर उत्पादन साठवणुक व उत्पादन प्रक्रिया केंद्र आवश्यक आहे.असे सांगितले.

डॉ प्रविण धुमाळ यांनी शेतकरी जगला पाहीजे. शेतकऱ्यांनी मातीमोल किमतीने शेती विकु नका.असे सांगत विविध शासनाच्या योजनांचे लाभ घेण्याचे आवाहन केले. सुशील रेळेकर आम्ही ग्रामीण भागात काम करीत आहोत. आम्हाला शेतकऱ्यांचे सहकार्य मिळत असते.शेती वाढली पाहीजेत यासाठी आमची संस्था कार्यरत असते.

यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, प्रयोगशील शेतकरी उपस्थित होते.यावेळी झाडे लावण्याचे आवाहन केले आहे.

# मानकीवली आदिवासी शाळेत डॉक्टर डे साजरा



**खोपोली: प्रतिनिधी**

डॉक्टर डे निमित्त खालापूर खालापूर तालुका मेडिकल असोसिएशन च्या वतीने मानकिवली आदिवासी शाळेत आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी केली त्याचप्रमाणे खाऊ वाटप केले व एका विद्यार्थिनीच वाढदिवस केक कापून साजरा केला वेळी बालरोग तज्ञ डॉ प्रमोद वानखेडे यांनी आरोग्य कसं सांभाळावे , आणि हात धुण्याची पद्धत याविषयी मुलांना मार्गदर्शन केले , डॉ नागरगोजे यांनी डॉक्टर्स डे महत्व आणि का साजरा केला जातो या विषयी मार्गदर्शन केले . असोसिएशन चे वतीने मुलांना टुथ ब्रश आणि हॅण्ड वॉश चे वाटप करण्यात आले. असोसिएशन चे वतीने शासकीय आश्रमशाळा मोफत उपचारासाठी दत्तक घेण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले .

याप्रसंगी खालापूर तालुका मेडिकल असोसिएशन चे अध्यक्ष डॉ आर एम पाटील , सचिव डॉ बबनराव नागरगोजे , सहसचिव डॉ श्रीकांत पाटील , खजिनदार डॉ मनोज मिश्रा , वैद्यकीय अधिकारी डॉ संगिता वानखेडे, डॉ प्रमोद वानखेडे , डॉ सुनील डोंगरे , डॉ शाम आठवले , डॉ संजय पाटील , डॉ सचिन पवार , डॉ गजानन चव्हाण , डॉ ज्योती पाटील , डॉ अविनाश पवार , डॉ योगिता पवार , डॉ गणेश मोरे , डॉ हर्षल शिंदे , डॉ वंदना विश्वकर्मा , डॉ नीता गोरे , डॉ मोहम्मद अली , उपस्थित होते.

## राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धा

# रायगडच्या खेळाडूंची नेत्रदीपक कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेमध्ये रायगडच्या खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. यामध्ये पाच सुवर्णपदक, ११ रौप्यपदक आणि १५ कास्यपदकांची कमाई या खेळाडूंनी केली आहे.

पुणे येथे २६ ते २९ जून २०२५ रोजी राज्यस्तरीय किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र (वाको इंडिया महाराष्ट्र) यांच्या द्वारे करण्यात आले होते. सदर स्पर्धा वाको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशन, मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर एन्ड स्पोर्ट्स, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, वर्ल्ड असोसिएशन ऑफ किकबॉक्सिंग ऑर्गनायझेशन आणि इंटरनॅशनल ऑलिम्पिक कौन्सिल यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने एकूण ४७ खेळाडू सहभागी झाले होते. त्यापैकी सुवर्णपदक, रौप्यपदक, कांस्यपदक मिळवत सुयश संपादित केले.




सुवर्णपदक विजेते अन्वी निकम, ईशान कुंभार –किक लाईट इव्हेंट), नक्ष वेणकर, सुयश पवार, चिराग शिवगण आहेत. तर रौप्यपदक विजेते पार्थवी भांड, पार्थ निकम, अनिकेत दुशिंग, प्रणव लब्दे, लावण्या जहा, शुभम जाधव, ईशान कुंभार, चैतन्य करमकर, वरद केणी , अन्वी निकम , ईशान कुंभार – लाईट कॉन्टॅक्ट इव्हेंट) आहेत. आणि कांस्यपदक विजेते वर्धन कदम, विहान आंबोलकर, मनोज भंडारी, गायत्री केणी, सोहम सावंत, प्रज्वल दरेकर, सार्थक भगत, निहारिका देशमुख, सम्यक कांबळे, प्रणव लबाडे, पार्थ निकम (किक लाईट इव्हेंट),पार्थवी भांड(किक लाईट इव्हेंट), रवीना म्हात्रे (पॉईंट फाईट,लाईट कॉन्टॅक्ट) दिव्यांका सुतार हे आहेत.

स्वप्निल राठोड, ऑस्टिन थॉमस, प्रणभ कांबळे, अथर्व मधाने, नुकुंज पिंगळे, प्रिन्स पाटील, फिरोज अन्सारी, स्वामिनी शिर्के, भूमी गवळी, पूर्वा गायकवाड, दिया भगत या खेळाडूंना पनवेल शहर किक बॉक्सिंग असोसिएशनचे कार्याध्यक्ष व मुख्य प्रशिक्षक सिहान निलेश भोसले यांचे मार्गदर्शन लाभले व विजेता खेळाडूंचे पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष परेश ठाकूर, सचिव मंदार पनवेलकर, रवींद्र म्हात्रे, प्रतीक कारंडे, वाको महाराष्ट्राची किकबॉक्सिंगचे अध्यक्ष निलेश शेलार यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नव्या क्रीडा धोरणामुळे खेळ आणि खेळाडूंना मिळणार पाठबळ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रीडा क्षेत्रात मागच्या काही वर्षात भारताने देदीप्यमान कामगिरी केली आहे. प्रतिकूल परिस्थितीत खेळाडूंनी धडे गिरवले आणि भारताचं नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजवलं. भारताने क्रिकेटशिवाय इतर खेळातही आंतरराष्ट्रीय पातळीवर झेंडा रोवला आहे. असं असताना भारताला क्रीडाक्षेत्रात आणखी भक्कमपणे उभं करण्यासाठी केंद्र सरकारने पाऊल उचललं आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने मंगळवारी राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ला मंजुरी दिली आहे. नवीन क्रीडा धोरणात भारताला क्रीडा महासत्ता बनवण्यासाठी आणि २०३६ च्या ऑलिंपिक खेळांसह आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्रभुत्व मिळविण्यासाठी एक दूरदर्शी आणि धोरणात्मक रोडमॅप आहे. नव्या क्रीडा धोरणात तळागाळातील क्रीडा स्पर्धांना भक्कम करण्याचं उद्दीष्ट आहे. या माध्यमातून खेळाडूंची पारख केली जाणार आहे. तसेच त्यांना भविष्यासाठी प्रोत्साहन दिलं जाईल. नव्या क्रीडा धोरणानुसार ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा पायाभूत सुविधा अजून अत्याधुनिक करण्याचा मानस आहे. यामुळे खेळाडूंना स्थानिक पातळीवरच आंतरराष्ट्रीय दर्जाचं प्रशिक्षण मिळणार आहे.

या धोरणांतर्गत खेळाडूंचं प्रशिक्षण, प्रशिक्षण आणि विकासाचे नियोजन केलं जाणार आहे. इतकंच काय तर नवीन क्रीडा धोरणांतर्गत खेळाडूंची कामगिरी सुधारण्यासाठी क्रीडा विज्ञान आणि औषधांवर विशेष भर दिला जाईल. प्रशिक्षक, तांत्रिक अधिकारी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांनाही चांगले शिक्षण दिले जाणार आहे. भारतात आंतरराष्ट्रीय स्पर्धांचं आयोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. या स्पर्धांमुळे भारतीय खेळाडूंचं मनोबल वाढेल तसेच भारतीयांमध्ये खेळाप्रती रूची आणि आदर वाढेल.

खेळांना राष्ट्रीय चळवळ बनवण्याचा मुख्य उद्देश या धोरणामागे आहे.

# शमीला पत्नी आणि मुलीला दरमहा चार लाख रुपये द्यावे लागणार

### घटस्फोट प्रकरणात हायकोर्टाचे आदेश

**कोलकाता : वृत्तसंस्था**

घटस्फोटानंतर कोलकाता उच्च न्यायालयाने मोहम्मद शमीला त्याची पत्नी हसीन जहाँ आणि मुलगी आयरा यांना दरमहा चार लाख रुपये देण्याचे आदेश दिले आहेत. शमीला ही रक्कम मासिक देखभाल म्हणून द्यावी लागेल. शमीच्या या प्रकरणाची सुनावणी २१ एप्रिल २०२५ रोजी झाली होती, ज्यावर १ जुलै रोजी निकाल आला.

आदेशानुसार हसीन जहाँला दरमहा १.५० लाख रुपये आणि मुलगी आयराला २.५० लाख रुपये मिळतील. ही रक्कम मागच्या सात वर्षांपासून लागू असेल. त्याचवेळी कनिष्ठ न्यायालयाला सहा महिन्यांत खटला निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मोहम्मद शमी आणि हसीन जहाँ यांचे लग्न ७



एप्रिल २०१४ रोजी झाले. मुलगी आयराच्या जन्मानंतर शमीला कळले की हसीन जहाँ आधीच विवाहित आहे आणि तिला तिच्या पहिल्या लग्नापासून दोन मुलेदेखील आहेत.

मोहम्मद शमीच्या पत्नीने क्रिकेटपटू आणि त्याच्या कुटुंबावर हिंसाचाराचा आरोप केला. त्यानंतर २०१८पासून या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. शमीच्या पत्नीला मिळणारी रक्कम कमी वाटत असल्याने तिने न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता.

# दुसऱ्या टी–२० सामन्यातही भारतीय महिला क्रिकेट संघ विजयी

## इंग्लंडचा २४ धावांनी घरच्या मैदानावर सलग दुसरा पराभव

**ब्रिस्टल : वृत्तसंस्था**

जेमिमा रॉड्रिग्ज आणि अमनजोत कौर यांच्या दमदार फलंदाजीमुळं भारतीय महिला क्रिकेट संघानं दुसऱ्या टी–२० सामन्यात इंग्लंडचा २४ धावांनी पराभव केला. या विजयासह टीम इंडियानं पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेत २–० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात जेमिमा आणि अमनजोत यांच्या शानदार कामगिरीमुळं भारतीय संघानं निर्धारित २० षटकांत ४ गडी गमावून १८१ धावा केल्या. प्रत्युत्तरात, यजमान इंग्लंडला २० षटकांत ७ गडी गमावून फक्त १५७ धावा करता आल्या. अशाप्रकारे टीम इंडियानं सलग दोन सामने जिंकले.



ब्रिस्टलमधील सीट युनिक स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी–२० सामन्यात जेमिमानं ६३ धावांची खेळी केली. जेमिमा व्यतिरिक्त अमनजोत कौरनंही नाबाद ६३ धावा केल्या. अमनजोतला तिच्या शानदार कामगिरीसाठी सामनावीर म्हणून निवडण्यात आलं. अमनजोत आणि जेमिमा यांच्यात ५५ चेंडूत ९३ धावांची शानदार फलंदाजी भागीदारी झाली. टीम इंडियानं पहिला टी–२० सामना ९७ धावांनी जिंकला होता.

इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी–२० सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या टीम इंडियाची सुरुवात खास झाली नाही. भारतीय संघानं शेफाली वर्माच्या रुपात अवघ्या १४ धावांवर पहिली विकेट गमावली. यानंतर स्मृती मंधाना देखील १३ धावा करुन बाद झाली. कर्णधार हरमनप्रीत कौरलाही फक्त १ धाव करता आली. अशाप्रकारे टीम इंडियानं फक्त ३१ धावांत तीन विकेट गमावल्या, पण येथून जेमिमा आणि अमनजोत यांनी मिळून भारतीय संघाला केवळ सांभाळलंच नाही तर एका मजबूत धावसंख्येपर्यंत पोहचवलं.

**दमदार गोलंदाजी**

फलंदाजीनंतर टीम इंडियानं गोलंदाजीतही आपली जादू दाखवली. टीम इंडियानं दिलेल्या १८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यजमान इंग्लंडला फक्त १७ धावांत तीन मोठे धक्के बसले. याशिवाय, भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडला प्रत्येक धाव घेण्यासाठी संघर्ष करावा लागला. टीम इंडियाची सर्वात यशस्वी गोलंदाज श्री चरणी होती, तिनं ४ षटकांत २८ धावा देत २ बळी घेतले. याशिवाय दीप्ती शर्मा आणि अमनजोत कौर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

### पॉवरलिफ्टिंग राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत

# महाराष्ट्राची अभिमानास्पद कामगिरी

**कर्नाटक : वृत्तसंस्था**

पॉवरलिफ्टिंग राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा २२ ते ३० जून २०२५ या कालावधीत दावणगिरी कर्नाटक या ठिकाणी झाली. यामध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अभिमानास्पद कामगिरी केली आहे.

महाराष्ट्रास २६० गुणांसह सांघिक विजेतेपद मिळाले आहे. यात सीनियरमध्ये पुरुष ४७ व महिला ४४ गुणांसह गटात विजेतेपद, सब ज्युनियर व ज्युनियर ४४ गुणांसह सांघिक उपविजेतेपद मिळाले आहे. निलेश गराटे राष्ट्रीय विक्रमासहित सुवर्णपदक, गणेश तोटे– रायगड–कास्यपदक, संकेत चव्हाण रौप्यपदक, सागर मिराशी सुवर्णपदक; सब–ज्युनिअर–पुरुष आदित्य मिस्त्री, मसुवर्णपदक, मयूर कोनकर, ठाणे सुवर्णपदक, ईशान सिंग, सुवर्णपदक; ज्युनिअर–पुरुष विराज पावसकर–सुवर्णपदक, चैतन्य पंदेकर रौप्य पदक, जस्वीरसिंग भाटिया, संभाजीनगर रौप्य पदक; सीनियर महिला गट काजल भाकरे, ठाणे रौप्य पदक, सुश्मिता देशमुख, ठाणे रौप्य





पदक, समृद्धी देवळेकर राष्ट्रीय विक्रमासहीत सुवर्णपदक, प्रेरणा साळवी सुवर्णपदक, निवेदिता खारकर रौप्य पदक, आश्लेषा गुडेकर रौप्य पदक; सब–ज्युनिअर महिला अचलकुमारी राजभर रायगड रौप्य पदक, सेजल बेलवलकर रौप्य पदक, तपस्या मते, पुणे रौप्य पदक, सई शिंदे, पुणे रौप्य पदक, अनुराधा राठोड सुवर्णपदक; ज्युनियर महिला सेजल मोईकर, पुणे रौप्य पदक, मृणाली भोग, पुणे या खेळाडूंना स्पर्धेदरम्यान संजीवन भास्करन, संजय सरदेसाई, सूर्यकांत गर्दे, अनंत चाळके, राजहंस मेंदळे व रक्षा महाराव यांचे मार्गदर्शन लाभले.

## टी–२० फलंदाजांमध्ये स्मृती मंधाना तिसऱ्या स्थानी

**मुंबई :** भारताच्या महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मंधानाला आयसीसी टी–२० फलंदाजांच्या क्रमवारीत फायदा झाला आहे. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी–२०मध्ये शतक झळकावल्यानंतर ती तिसऱ्या स्थानावर पोहचली. ११२ धावांच्या खेळीमुळे मंधानाने कारकिर्दीतील सर्वोत्तम ७७१ रेटिंग गुण मिळवले.

एकदिवसीय क्रमवारीत स्मृती पहिल्या क्रमांकावर आहे. टी–२० कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. इंग्लंडविरुद्धचे शतक हे मंधानाचे टी–२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक होते. यासह ती तिन्ही फॉरमॅटमध्ये शतक करणारी पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू बनली. कारकिर्दीतील सर्वोत्तम खेळी करत ऑस्ट्रेलियाच्या ताहलिया मॅकग्राला फलंदाजांच्या क्रमवारीत चौथ्या स्थानावर ढकलले. ऑस्ट्रेलियाची बेथ मुनी पहिल्या स्थानावर आणि वेस्ट इंडिजची हेली मॅथ्यूज दुसऱ्या स्थानावर कायम आहे. भारतीय खेळाडूंमध्ये शेफाली वर्मानेही एका स्थानाची झेप घेत १३वे स्थान मिळवले.

# माजी कुस्तीपटू विनेश फोगाटला पुत्ररत्न




**दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक पदक विजेती माजी कुस्तीपटू विनेश फोगाट यांना पुत्ररत्न प्राप्त झाले आहे. विनेश फोगाटने दिल्लीतील एका खासगी रुग्णालयात मुलाला जन्म दिला आहे.

विनेशला सोमवारी ३० जून रोजी संध्याकाळी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर मंगळवारी विनेशने १ जुलै रोजी मुलाला जन्म दिला.

विनेश फोगटची प्रसूती ऑपरेशनद्वारे झाली. विनेश आणि बाळ दोघेही पूर्णपणे सुरक्षित आहेत. दोघेही ठणठणीत आहेत, अशी माहिती विनेशचे सासरे राजपाल राठी यांनी दिली. विनेश आणि सोमवीर १४ डिसेंबर २०१८ रोजी विवाहबंधनात अडकले होते. विनेश आणि सोमवारी या दोघांची पहिली भेट २०११ साली झाली होती. या दोघांची ओळख झाली. ओळखीचे रुपांतर मैत्रीत आणि मग प्रेमात झाले. सोमवीरने विनेशला २०१८ साली विमानतळावर लग्नाची मागाणी घातली होती.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com